# प्रकरण चार

## कृषी विभाग

**4.363 50 टक्के अनुदानाने जिल्हा परिषदेकडून पुरवठा केलेले साहित्य शिल्लकेबाबत. (जिल्हा फंड)**

**पंचायत समिती वसई, जिल्हा पालघर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती वसई अंतर्गत कृषि विभागाने साहित्य शिल्लक व 50 टक्के लाभार्थी हिस्सा रुपये 2,14,816/- वसुल केलेला नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक झेडपीए/2009/ प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 मधील नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार पालन झालेले नाही.

2) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक 1084/सी/आर/1633,दिनांक 16/09/1995 अन्वये लाभार्थी हिश्श्याची रक्कम वसुल न करताच मागणीपत्र नोंदविले आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद / पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 50 नुसार न.न.10 प्रमाणे लाभार्थी हिस्सा वसूलीची पावती देणेत आलेली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद / पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 146 नुसार साहित्याचा योग्य प्रकारे विनियोग / वापर झाला किंवा कसे याबाबत लाभार्थीकडून करारनामा करून घेतलेला नाही.

5) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक परास/1083/प्र.क्र1954/ 67,दिनांक 02/07/1993 अन्वये लाभर्थीकडून विनियोग प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

6) प्राप्त साहित्य ज्या त्या वर्षात वाटप होणे आवश्यक असताना अशी कार्यवाही झालेली नाही.

**4.364 नॅपसॅक स्प्रेपंप पुरवठा करणे.**

**पंचायत समिती पेण, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती पेण यांनी पंचायत समिती सेस अंतर्गत नॅपसॅक स्प्रेपंप पुरवठा करण्यासाठी रक्कम रूपये 1,98,762/- इतका खर्च करणेंत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परीपत्रक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9 मंत्रालय मुंबई, दिनांक 20/06/2008 अन्वये ठरवून दिलेल्या कालमर्यादेनुसार सदर योजना राबविण्यात आल्याचे दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 50 नुसार ज्या व्यक्तीकडून जिल्हा परिषदेच्या वतीने रक्कम स्वीकारली आहे. त्या व्यक्तीला नमुना नंबर 10 ची पावती देणे आवश्यक असतांना देण्यात आलेली नाही.

3) लाभार्थी हिस्स्याची वसूली केल्याची खात्री करता आली नाही.

4) पंचायत समितीच्या अर्थसंल्पात 50 टक्के लोकवाटा समाविष्ट करून सभागृहाची मान्यता घेऊन व प्रशासकीय व तांत्रीक मान्यता घेणे आवश्यक असतांना गटविकास अधीकारी यांनी तशी कार्यवाही केलेली नाही.

5) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक 1084/सी.आर./1627,दिनांक 19/01/1985 नुसार लोकवाटा जमा झाल्यानंतर पुरवठा आदेश देणे आवश्यक असतांना त्यानुसार कार्यवाही केलेली नाही.

6) सदर योजनेची मास्टर रजिस्टर वाटप नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83(3) नुसार प्रत्यक्ष वस्तूचा दर्जाचे प्रमाणपत्र देणे आवश्यक असतांना देण्यात आलेले नाही.

7) पंचायत समितीने पुरवठादारास दिनांक 27/11/2014 रोजी नॅपसॅक स्प्रे पंप पुरवठयाचा आदेश दिला व पुरवठा दिनांक 12/03/2015 रोजी केला आहे. सदर बाबत पुरवठयाचा कालावधी व उशीरा पुरवठा केल्यास दंडाची रक्कम याचा पुरवठा आदेशात उल्लेख नसल्याने साहित्याचा खुप उशीरा पुरवठा झाल्याचे दिसते व दंडात्मक कार्रवाइ केली नसल्याचे दिसून येते.

8) एकूण 157 नॅपसॅक स्प्रेपंप साहित्याचा पुरवठा केल्यावर फक्त 40 लाभार्थ्यांनी नॅपसॅक स्प्रेपंप नेले आहेत, व 117 नग शिल्लक आहेत, सदर पंप वाटप करून 117 नॅपसॅक स्प्रेपंपाचे 50 टक्के लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 74,061/- वसूल करून पंचायत समितीत भरणा करावा.

9) पंचायत समितीने लाभार्थ्यांना दिलेल्या लाभाचा दुरूपयोग करू नये व वस्तूंची विक्री करू नये म्हणून त्यांच्याकडून बंधपत्र/करारनामा करून घेतला नाही.

**4.365 सौर कंदिल खरेदीबाबत.**

**पंचायत समिती पेण, जिल्हा रायगड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती पेण यांनी पंचायत समिती सेस अंतर्गत सौर कंदील खरेदीसाठी एकूण रक्कम रूपये 1,00,582/- इतका खर्च करण्यात आला आहे, याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारणविभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्र.क्र.446/ वित्त-9, दिनांक 20/06/2008 अन्वये वैयक्तीक लाभाच्या योजनेची वेळापत्रकाप्रमाणे काटेकोरपणे अंमलबजावणी केल्याचे दिसून येत नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक पं.रा.स./ 1020/प्र.क्र.14/38, दिनांक 19/02/2001 नुसार पंचायत समिती सर्वसाधारण सभेत लाभार्थ्यांची निवड यादी तयार करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही न करता लाभार्थ्यास सौर कंदीलाचे वाटप करण्यात आले.

3) प्राप्त सौर कंदील कोणत्या कंपनीकडून खरेदी केलेले आहे, व कोणत्या दर्जाचे आहे.याचा उल्लेख साठा नोंदवहीमध्ये घेण्यात आलेला नाही.

4) पंचायत समितीने लाभार्थ्यास सदर योजनेतून दिलेल्या लाभाचा व दुर्विनियोग करून नये तसेच वस्तूची विक्री करू नये या करीता बंधपत्र / करारनामा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा सहिता 1968 चे नियम 50 नुसार ज्या व्यक्तीकडून जिल्हा परिषदेच्या वतीने रक्कम स्वीकारली आहे, त्या व्यक्तीला नमुना नंबर 10 ची पावती देणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

6) एकूण 57 सौर कंदीलाचा लाभार्थी हिस्सा रक्कम रूपये 49,305/- वसूल करून पंचायत समिती सेस मध्ये जमा करावी.

7) पुरवठादाराकडून 2 टक्के आयकर कपात केल्याचे दिसून आले नाही, तरी रक्कम रूपये 1972/- वसूल करावी.

8) एकाच व्यक्तीस दुबार लाभ मिळू नये यासाठी मास्टर रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे, परंतू त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

9) वस्तूंचा दर्जा व योग्यता खरेदीपुर्वी तपासून घेऊन मान्यता प्रमाणपत्र् महाराष्ट्र शासन जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) नुसार गटविकास अधिकारी यांनी दिले नाही.

10) खरेदी करण्यात आलेले सौर कंदिल नादुरूस्त झाल्यास सदर सौरकंदील दुरूस्त करणेसाठी सेवा देणे बाबत कोणत्याही प्रकारचे आवश्यक ते कागदपत्र (गॅरंटी कार्ड किंवा हमी पत्र) लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. त्यामूळे सदर सौरकंदील नादुरूस्त झाल्यास ते दुरूस्त करणेबाबत काय उपाय योजना केली, याची खात्री करता आली नाही.

**4.366 50 टक्के अनुदानावर शेतक-यांना होंडा मेक 'पॉवर स्प्रेअर' पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदर योजनेवर पंचायत समिती देवगड यांनी रक्कम रुपये 3,24,280/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1**)** पंचायत समिती देवगड यांनी आदेश क्रमांक 4104,दिनांक 27/03/2015 नुसार महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ, मिरजोळे, रत्नागिरी यांना 22 नग होंडा मेक पॉवर स्प्रे पुरविणेबाबत पुरवठा आदेश दिलेला आहे.

तथापि पुरवठादाराने लेखापरिक्षण कालावधी पर्यंत औजाराचे साहित्य पुरवठा केलेले नाही. त्यामुळे लाभार्थींना फवारणी हंगामात पॉवर स्प्रे पंप देता आले नाहीत. याबाबत दिनांक 10/09/2015 च्या पत्रान्वये साहित्याचा पुरवठा वेळेत न केल्यास दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे.

2) लाभार्थी मंजुर यादी तयार न केल्यामुळे योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना झाला याची खात्री देता येत नाही.

3) पुरवठा दाराने वस्तुंचा पुरवठा केला अगर कसे याबाबत खात्री न झाल्याने पंचायत समिती सेस अनुदानाची रक्कम रुपये 3,24,280/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**4.367 50 टक्के अनुदानावर शेतक-यांना भात मळणी यंत्र पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर योजनेवर पंचायत समिती देवगड यांनी रक्कम रुपये 1,73,950/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) सदर योजनेबाबत लाभार्थी मंजुर यादी तयार केलेली नाही. त्यामुळे लाभार्थी निवड न करताच योजनेची अंमलबजावणी केलेली दिसून येते.

2) पात्र लाभार्थींचे कागदपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

3) महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ मिरमोळे रत्नागिरी यांनी पुरवठा आदेशानंतर 49 भात मळणी यंत्र लेखापरीक्षण कालावधी पर्यंत पुरवठा केलेली नाही. त्यामुळे लाभार्थींना वेळेत भात मळणी यंत्र देता आली नाहीत. तरी संबंधित पुरवठादारावर दंडात्मक कारवाई होणे आवश्यक आहे.

4) पुरवठादाराने यंत्राचा पुरवठा केला नसताना पुरवठादाराच्या नावे आगावू रक्कम धनादेशाने काढली आहे, त्यामुळे रक्कम रुपये 1,73,950/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

**4.368 50 टक्के अनुदानावर लाभार्थींना उर्जा बचत दिवे पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती देवगड, जिल्हा सिंधुदुर्ग, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** सदर योजनेवर पंचायत समिती देवगड यांनी रक्कम रुपये 2,96,500/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी मंजुरी यादी निश्चित न करता योजनेची अंमलबजावणी केलेली आहे. त्यामुळे योग्य लाभार्थींना साहित्याचे वाटप झालेबाबत खात्री देता येत नाही. तसेच पात्र लाभार्थ्यांचे आवश्यक कागदपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2) रक्कम रुपये 100/- च्या बॉंड पेपरवर करारनामा केलेला नाही. तसेच त्यावर दिनांक व गटविकास अधिका-यांनी करारपत्र केल्याबाबत स्वाक्षरी नाही. त्यामुळे सदर करारपत्र साहित्य खरेदीच्या पूर्वी केले किंवा कसे याबाबत खात्री होणे आवश्यक आहे.

3) साठा नोंदवहीतील पृष्ठ क्र.68 वर दिनांक 31/3/2015 रोजी 1186 बल्ब प्राप्त झाल्याची नोंद आहे. यावरुन करारनाम्यातील अटीनुसार 6 दिवस साहित्याचा विलंबाने पुरवठा झालेला आहे. याबाबत दंडात्मक कार्यवाही होणे आवश्यक आहे.

4) लेखा परिक्षण कालावधीपर्यंत फक्त 4 लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप झालेले असून त्यांचेकडून 250/- खर्चाप्रमाणे 1000/- रुपये वसुल केले आहेत. म्हणजेच एकूण लाभार्थी हिश्यापैकी 1,45,628/- रुपये लाभार्थी हिस्सा वसूल होणे बाकी आहे.

5) लेखापरीक्षण कालावधीपर्यंत साहित्याचे वाटप न झाल्याने बल्ब डॅमेज होण्याची व योजनेचा मुळ उददेश सफल न होता पैशाचा अपव्यय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

6) साहित्याचे हमी कालावधी प्रमाणपत्र अथवा गॅरंटी कार्ड लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाही.

7) साहित्याचा दर्जाबाबत महाराष्ट्र विद्यूत बोर्ड अथवा तत्सम संस्थेकडील प्रमाणपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध न झाल्याने साहित्याच्या गुणवत्तेबाबत खात्री देता येत नाही.

**4.369 पंचायत समिती सेस अंतर्गत 50 टक्के अनुदानातुन नॅपसॅक पंप पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती नांदगांव, जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती सेस अंतर्गत 50 टक्के अनुदानातुन नॅपसॅक पंप पुरविणे साठी रूपये 1,49,388/- एवढा खर्च करणेत आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त-9,दिनांक 20/06/2008 अन्वये योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी नमुद वेळापत्रकानुसार करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास-1084/सीआर/1633/57 दिनांक 18/01/1995 नुसार लाभार्थी हिस्सा प्रथम वसुल करुन नंतर योजना राबविणे आवश्यक असतांना साहित्य खरेदी करण्यांत आलेली असतांनाही लाभार्थी हिस्सा अदयापपर्यंत वसुल करुन भरणा केलेला नाही.

3) दरकरार, मार्गदर्शक सुचना, मुळ दरकरार प्रत अथवा सत्य प्रत लेखपरीक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे दराबाबत खात्री करता आली नाही.

4) लाभार्थींना दुबार लाभ टाळण्याचे दृष्टीने शासन परिपत्रक क्रमांक पंरास 10958/ प्र.क्र.73/34, दिनांक 20/11/1999 नुसार लाभार्थीचे ' प्रपत्र अ ' मध्ये मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

5) पंचायत समितीचे मासिक सभेतील ठरावानुसार योजनेची निवड करणेत आलेली असून लाभार्थ्यांची निवड कशा आधारे केली व यादी नाही. पुरवठादाराकडून राष्ट्रीयकृत बँकेची 10 टक्के रकमेची बँक गॅरंटी प्राप्त केलेली नाही.

6) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/(2512) उद्योग-6,दिनांक 02/01/1992 परिच्छेद 8.6 नुसार साहित्य प्राप्त झालेनंतर गटविकास अधिकारी यांनी प्रमाणपत्र नमूद केलेले नाही. साहित्याचा पुरवठा झालेनंतरचा दर्जाबाबतचा चाचणी अहवाल प्राप्त नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/ 1093/प्र.क्रं.1239/ 34,दिनांक 01/01/1993 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात वाटप होणे आवश्यक असतांना लेखापरीक्षण कालावधी पावतो 110 नग नॅपसॅक पंप वाटपाचे बाकी आहे. मागणी नसतांना अवास्तव खरेदी करण्याचे प्रयोजन काय.

**4.370 पंचायत समिती सेस अंतर्गत 50 टक्के अनुदानातुन 5 एचपी इलेक्ट्रिक पंप संच (कृषि औजोरे) व ओपन वेल सबमर्सिबल 9/5 एच पी इलेक्ट्रिक मोटार संच खरेदीतील अनियमितता.**

**पंचायत समिती निफाड, जिल्हा नाशिक, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती सेस योजना 50 टक्के अनुदानातुन 5 एचपी इलेक्ट्रिक पंप संच (कृषि औजोरे) ओपन वेल सबमर्सिबल 3 एचपी इलेक्ट्रिक मोटार संच खरेदीसाठी रक्कम रुपये 8,06,250/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रमविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त मंत्रालय मुंबई 32,दिनांक 20/06/2008 योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी नमुद वेळापत्रकानुसार करण्यात आलेली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रमविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1084/सीआर/ 1633/57,दिनांक 18/01/1995 नुसार लाभार्थी हिस्सा प्रथम वसुल करुन योजना राबविणे आवश्यक असताना अगोदर साहित्य खरेदी करण्यात आलेली आहे.

3) मोटार पंप संच खरेदीचे पुर्ण बिल प्राप्त करुन पुरवठादारास 50 टक्के पंस सेस रक्कम आयकर रुपये 9,272/- कपात करून अदा केलेली आहे. उर्वरित 50 टक्के रक्कम लाभार्थ्याकडून वसुल करुन पुरवठादारास डी डी ने पाठविलेली निदर्शनास आले नाही. आयकर कपात रक्कम रुपये 18,543/- वसुल करुन शासन भरणा करुन पुर्तता दाखवावी.

4) एकुण लाभार्थी यादी नुसार 3 एच पी संच साठी 20 प्रस्ताव प्राप्त असून 25 नग खरेदी केलेले आहे. तसेच एकुण लाभार्थी यादी नुसार 5 एच पी संच साठी 52 प्रस्ताव प्राप्त असून 60 नग खरेदी केलेले आहे, याबाबत खुलासा सादर करावा.

3 एच पी 5 नग आणि 5 एच पी = 8 नग असे एकुण 13 नग वाटप झालेले नाही. व त्याचा तपशिल साठा नोंदवहीमध्ये सुध्दा निदर्शनास येत नाही. याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे. चौकशी अंती वस्तुंचा अपहार झाल्याचे निदर्शनास आल्यास रक्कम रुपये 2,42,500/- वसुल करावी.

5) शासन परिपत्रक क्रमांक पंरास10958/प्र.क्र.73/34 दिनांक 20/11/1999 नुसार लाभार्थीचे प्रपत्र-अ प्रमाणे नोंदवही ठेवून (मास्टर नोंदवही) लाभार्थ्यांना दुबार लाभ टाळण्याचे दृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. एकाच लाभार्थीस दुबार लाभ दिला नसलेचे प्रमाणित होणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस-1088/(2512) नुसार उद्योग-6,दिनांक 02/01/1992 मधील परिच्छेद 8.6 नुसार साहित्य प्राप्त झालेनंतर गटविकास अधिकारी यांनी प्रमाणपत्र नमूद केलेले नाही. साहित्याचा पुरवठा झालेनंतर दर्जाबाबत चाचणी अहवाल प्राप्त नाही.

7) लाभार्थी हिस्सा भरणा दिनांक 21/01/2015 असे असताना त्यांना दिनांक 20/01/2015 पासून वाटप कसे केले याबाबत खुलासा सादर करावा.

8) विभागीय व्यवस्थापक, महाराष्ट्र कृषि, उद्योग विकास महामंडळ मर्या, नाशिक यांना पासबुकानुसार डी.डी. दिनांक 02/02/2015 रोजी पाठविल्याची नोंद आहे. मात्र पोहच पावतीवर दिनांक 10/05/2015 अशी नोंद आढळून आली आहे.

9) सदर योजनेचे प्रस्ताव तपासणी करता काही लाभार्थ्यांच्या 7/12 वर स्वत:ची विहीर असलेबाबत नोंद नाही. लाभार्थीकडे पुर्वीची 3/5 एचपी इलेक्ट्रीक मोटार आहेत, लाईट बील कनेक्शन नाही. अशा त्रुटी असतांना कृषि अधिकारी यांनी सदर अपात्र लाभार्थीस लाभ प्रस्तावित केले आहे. तसेच पुरवठादाराने गटाच्या पोहचपावत्या सादर केलेल्या नाही.

**4.371 पंचायत समिती 20 टक्के अनुदानातून मागासवर्गीय शेतकऱ्यांना शेतीकामासाठी 100 टक्के अनुदानावर एच.डी.पी.ई. पाईप खरेदी करणेबाबत.**

**पंचायत समिती धुळे, जिल्हा धुळे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** उपरोक्त खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास-1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात होणे आवश्यक असतांना अशी कार्यवाही झाली नाही, तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त 9,दिनांक 20/06/2008 मधील नियोजीत कार्यक्रमानुसार योजना राबविली गेली नसल्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाला नाही. विहित कालावधीत साहित्य वाटप झालेले नाही.

2) दरकरारामधील शेडयुल 2 मधील अटी व शर्तीनुसार 90 टक्के रक्कमेची अदाई साहित्य प्राप्त झालेवर आणि उर्वरीत 10 टक्के मानकाप्रमाणेच साहित्य मिळाले असल्याची खात्री करुन करावयाची आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 83 83 (3) चे पालन केलेले नाही. सक्षम प्रधिकाऱ्याकडुन चाचणी / तपासणी अहवाल प्राप्त न करताच 100 टक्के रक्कमेची अदाई केली आहे.

3) उपरोक्त पूरवठादारचे देयकातुन भारतीय आयकर अधिनियम 1961 नुसार रक्कम रुपये 4,277/- इतका आयकर कपात केलेला नाही.

4) पुरवठा आदेशात पाईपचे वजन 3.7 किलोग्रॅम वजनाचे नमूद असतांना प्रत्यक्षात पुरवठा करण्यात आलेल्या पाईपच्या देयकाची पडताळणी केली असता पाईपचे वजन 3.5 किलोग्रॅमचा पुरवठा करण्यात आलेला आहे. म्हणजेच प्रत्येक पाईप 0.2 किलोग्रॅम कमी वजनाचा करण्यात आलेला आहे, त्यामुळे रुपये 11,375/- जादा प्रदान करण्यात आले आहे.

5) पुरवठा आदेशाप्रमाणे पुरवठा न केल्यामुळे पुरवठा आदेशातील अटी व शर्तीचा भंग केला आहे.

6) गुणवत्ता व तपासणी प्रमाणपत्रावर तपासणी व निर्गमनाचा दिनांक नमुद करण्यात आलेली नाही.

7) वाटप करण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या प्रस्तावाची तपासणी केली असता वैयक्तिक लाभाची योजना राबविण्यासाठी ठरविण्यात आलेल्या अटी व शर्ती पुर्ण न करणा-या अपात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

**4.372 सेस फंडांतर्गत 50 टक्के अनुदानावर स्प्रे पंप पुरविणे.**

**पंचायत समिती नंदुरबार, जिल्हा नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती नंदुरबार यांनी स्प्रे पंप खरेदीसाठी प्रमाणक क्रमांक 3, दिनांक 27/03/2015 रक्कम रुपये 2,00,000/- खर्च केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/05, दिनांक 09/10/1997 नुसार औजारांची खरेदी करण्यापुर्वी लाभार्थ्यांच्या निवडीची प्रक्रीया योजनेची सर्व गावात प्रसिध्दी देवून ग्रामसभेतच्या शिफारशीने प्राप्त अर्जामधुन विहीत निकषानुसार निवड करुन मागणी निश्चित करुन लाभार्थी हिस्सा वसुल करुन त्यानंतर खरेदी प्रक्रिया पुर्ण करणे आवश्यक असतांना पंचायत समितीने लाभार्थी निवड न करतांच खरेदी केलेली आहे.

2) ग्रामविकास जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त्-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबविण्याचे वेळापत्रक ठरविण्यात आले आहे. त्यानुसार सदर योजना विहीत वेळापत्रकाप्रमाणे राबविण्यात आलेली नाही.

3) ग्राम विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1084/सीआर16/33,दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिश्याची रक्कम लाभार्थ्यांकडुन वसुल केल्याशिवाय योजना कार्यान्वीत करु नये.

4) औजारे साठा नोंदवहीत साठा प्राप्त दिनांक 31/03/2015 नग 316 साठा नोंदवहीत पान क्र.96 वर नोंद घेण्यात आलेली आहे. वस्तू दिनांक 31/03/2015 रोजी प्राप्त झालेला असतांना देयक दिनांक 27/03/2015 रोजी पारीत करुन रक्कम अदा केल्याचे दिसून येते. सदर साहित्याचे वाटप विहीत मुदतीत केलेले नाही. लेखापरिक्षण कालावधीपर्यंत 95 स्प्रे पंप शिल्लक होते.

5) ग्रामविकास जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पीआरसी.1083/67, दिनांक 02/07/1993 नुसार लाभार्थ्यांकडुन विनियोग प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

6) संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे मार्गदर्शक सुचनेनुसार योजनेची तपासणी संबंधित कृषि अधिकारी यांना दिलेल्या टक्केवारीनुसार केलेली नाही.

**4.373 अनुसुचित जाती उपयोजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील अनुसुचित जाती / नवबौध्द शेतकऱ्यांना कृषि विकासासाठी अर्थसहाय्य देण्याच्या योजनेअंतर्गत बैलजोडी खरेदी.**

**पंचायत समिती नंदुरबार, जिल्हा नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती नंदुरबार यांनी बैलजोडी खरेदी खरेदीसाठी प्रमाणक क्रमांक 75, 76 दिनांक 25/02/2015 रक्कम रुपये 18,60,000/- खर्च केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी निवड यादीतील अ.क्र.9 श्री.प्रल्हाद भाईदास शिरसाठ व अ.क्र. 41 श्रीमती मिनुबाई भाईदास शिरसाठ एकाच कुटुंबातील लाभार्थी असल्याचे दिसुन येते. निवड योग्य् न झाल्याने रुंपये 30,000/- वसुलपात्र ठरते.

2) खालील लाभार्थी एकाच कुटुंबातील लाभार्थी असल्याचे दिसुन येते त्यांच्या मुळ प्रस्तावासोबत शिधापत्रीका पहावयास मिळाल्या नाहीत.श्री.वेडु पुना ओंकार, श्री.भरत पुना ओंकार व श्री.लोटन पुना ओंकार रा.निंभेल हे एकाच कुटुंबात लाभ दिल्याचे दिसुन येते त्यामुळे इतर लाभार्थी लाभापासुन वंचीत राहिले आहेत.

3) प्रस्तावासोबत 7/12 व 8 अ जोडलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास 1098 पत्र क्रमांक 73/34,दिनांक 20/10/1999 अन्वये प्र.पत्र अ मध्ये लाभार्थी नियंत्रण नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि पंचायत समितीने

लाभार्थी यांच्या नावाची गावनिहाय नियंत्रण नोंदवही ठेवलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक पीआरसी-1083/67, दिनांक 02/02/1993 नुसार लाभार्थ्याकडुन विनीयोग प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

**4.374 आदिवासी उपाययोजना क्षेत्रातंर्गत टी एस पी योजनांतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांऐवजी दुसऱ्याच लाभार्थ्यांना बैलजोडी खरेदीचा लाभ देण्याबाबत अनियमीतता.**

**पंचायत समिती शहादा, जिल्हा नंदुरबार, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 22) -** आदिवासी उपाययोजना क्षेत्रातंर्गत टी एस पी योजनांतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांऐवजी दुसऱ्याच लाभार्थ्यांना बैलजोडी खरेदीचा रुपये 30,000/- लाभ देण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निवडयादीमधील अ.क्रं. 6 चे लाभार्थी श्री चिंधु शंकर महिरे हे मयत असतांना त्यांचे ऐवजी श्रीमती शेवंताबाई चिंतामण महिरे यांना लाभ दिलेला आहे. परंतु वारसांच्या निवड यादीत प्रत्यक्ष नाव श्रीमती शेवंताबाई चिंधु महिरे ह्या मयतांच्या वारसदार पत्नी यांचे गाव वैजाली, ता. शहादा असे असतांना सदर श्रीमती शेवंताबाई चिंतामण महिरे यांना रुपये 30,000/- लाभ कसा देण्यात आला.

2) मार्गदर्शक तत्वाच्या सुचनानुसार नावात बदल केल्याचे प्रतिज्ञाप्रमाणपत्र प्राप्त नाही.

**4.375 कृषी विभागाकडील शिल्लक साहित्याबाबत.**

**पंचायत समिती राहता, जिल्हा अहमदनगर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती, राहता येथील कृषी विभागाचे सन 2014-15 चे लेखापरीक्षणात शिल्लकसाठा दिनांक 31/03/2015 अखेर साठा नोंदवहीवरून शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. त्या अंतर्गत जिल्हा परिषद सेस मध्ये पॉवर स्प्रे पंप चे 24 नग शिल्लक आहे, मका विकास योजना चे PVC पाईप 200 शिल्लक आहे व गळीत धान्य चे अवजारे PVC पाईप चे 310 नग शिल्लक आढळुन आले.

**4.376 कृषी विभागात राबविलेल्या विविध योजनाबाबत.**

**पंचायत समिती वेल्हा, जिल्हा पुणे, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 48) -** पंचायत समिती वेल्हा, कृषी विभागाने सन 2014-2015 मध्ये जिल्हा परिषद निधीतून 50 टक्के अनुदानावर राबविलेल्या योजनांचे प्रस्ताव, साठा नोंदवही, इत्यादी अभिलेखे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समितीने जिल्हा परिषद निधीतून राबविलेल्या विविध योजनांचे लाभार्थी प्रस्ताव अपुर्ण असल्याचे दिसून आले लाभार्थी अर्जावर दिनांक, आवक क्रमांक, जावक क्रमांक, याबाबी नमूद केलेल्या नाहीत. तसेच लाभार्थी अर्जात हमीपत्रे भरलेली नाहीत, काही प्रस्तावांची सहपत्रे साक्षांकित केलेली नाहीत. योजनांचे प्रस्ताव अपुर्ण असतानाही लाभार्थ्यांना लाभ देऊन अनियमितता झालेली आहे.

1) जिल्हा परिषद निधी 50 टक्के अनुदानावर ताडपत्री वाटप योजना सदर योजनेच्या 1. दगडू गणपत जाधव, सोंडे हिराजी 2. मारुती गोजू हरपाळे, लाशिरगाव 3. सखाराम गेनबा धरपाले, लाशिरगाव 4. अंकुश अनंत शेंडकर, दापोडे 5. किसन नथू खुळे, खोडद 6. महेंद्र सर्जेराव दारवडकर, रांजणे 7. विठोबा नारायण लिम्हण, विझर ह्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

2) बॅटरी स्पेपंप वाटप योजना 1. दत्तात्रय गेनबा शिंदे, खरीव 2. कृष्णा बाबुराव शिळीमकर, बोरावके ह्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव उपलब्ध् झाले नाहीत.

3) कडबाकुटटी यंत्र वाटप योजना 1. रसाळ मारुती भिका, दापवडी 2. लक्ष्मण सोनबा नलावडे, वाजेघर 3. महादेव विठोबा भोसले, विंझर 4. तुकाराम विठोबा रसाळ, कादवडी 5. मधुकर नारायण तोडकर, खामगाव 6. विजय विठठल शेंडकर, दापोडे 7. योगेश हनुमंत मालुसरे, वांगणी 8. राजाराम भानुजी शेंडकर, दापोडे 9. सुनिल नारायण

नलावडे, निगडेमोसे 10. शिवाजी हनुवती नलावडे, निगडेमोसे हया लाभार्थ्यांची वीज देयके उपलब्ध् झाली नाहीत. सचिन प्रताव पिलावरे, निगडे बु., नमूना 8 अ व 7/12 चे उतारे नाहीत.

4) प्लॅस्टीक क्रेटस वाटप योजना 1) कृष्णाबाई मारुती धरपाळ 2) मथुबाई बाबुराव कड, कोणतेही सहपत्रे जोडलेली नाहीत, लाभार्थ्यांचे प्रस्ताव उपलब्ध झाले नाही.

5) कॉपर ऑक्सीसक्लोराईड वाटप योजना 1) महिपती सावळा शिंदे, करंजावण 2) तानाजी मारुती भगत, निगडे बु 3) शहाजी मारुती धरपाळे, वांझळ 4) गणपत मारुती भगत, निगडे बु 5) सुरेश मारुती धरपाळे, वांझळे 6) संतोष माणिकराव शिळीमकर, आसणी मंजाई 7) शांताराम मारुती भगत, निगडे बु. 8) विष्णू बाबुराव रांजणे, साखरे 9) गणपत सावळा शिंदे, करंजावणे 7/12 व नमूना 8अ चा उतारा नाही,हया लाभार्थ्यांचे प्रस्ताव नाहीत.

6) 75 एमएम पी.व्ही.सी. पाईप 1) संदिप अंकुश तुपे, निगडे बु. 2) बाळू भावू कोकरे, केतकावळे 3) सुदाम शंकर सणस, अंबवणे 4) यशवंत गोविंद पोळेकर, पाल बु. 7/12 व नमूना 8अ चा उतारा नाही

**4.377 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप पुरविणे.**

**पंचायत समिती कराड, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती कराड यांनी 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप पुरविणे या योजनेवर रक्कम रुपये 3,99,000/- इतका खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन परिपत्रक, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मध्ये विहीत केलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही न करता विलंबाने कार्यवाही केलेली आहे.

2) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्रमांक पंरास/सीआर,दिनांक 19/01/1988 नुसार लाभार्थी हिस्सा वसूल केल्याशिवाय खरेदी करु नये असे असतांना लाभार्थी हिस्सा जमा होण्यापूर्वीच पुरवठा आदेश दिला आहे. तसेच पंचायत समिती स्तरावर लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

3) डिलीव्हरी चलनानुसार दिनांक 13/11/2014 रोजी प्राप्त 200 नगांपैकी दिनांक 03/01/2015 रोजी 100 नगांचे वाटप करण्यात आलेले असून दिनांक 31/3/2014 अखेर 140 नग शिल्लक राहिलेले आहेत. सदर साहित्याचे दिनांक 29/07/2015 रोजी लाभार्थी हिस्सा जमा करुन वाटप करण्यात आलेने योजना यशस्वी राबविली न गेल्याचे स्पष्ट होते.

4) लाभार्थी हिस्सा पुरवठादारास अदा केलेबाबतची पोहचपावती घेतलेली नाही. तसेच योजनेच्या अटींनुसार विनीयोगाबाबतच्या 100 टक्के तपासणीची कार्यवाही गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी केलेली नाही.

**4.378 अल्प / अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना 75 टक्के अनुदानावर कॅन्व्हास ताडपत्री पुरविणे.**

**पंचायत समिती पाटण, जिल्हा सातारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती पाटण यांनी पंचायत समिती सेस अंतर्गत सदर योजनेवर रुपये 4,67,682/- इतका खर्च केला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निर्णय, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दिनांक 10/03/2011 व शुध्दीपत्र क्रमांक झेडपीए 2010/अनोंस-133/प्र.क्र.168/पत्र1, दिनांक 22/07/2011 अन्वये वैयक्तिक लाभाच्या योजना राबविणेसाठी वेळापत्रक घालून दिलेले असून त्यानुसार कार्यवाही झालेली नाही.

2) भावबंध करारातील अट क्रमांक 8 अन्वये पुरवठा पश्चात साहित्याची तपासणी करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही झालेली नाही.

3) स्टॉबबुकमधील नोंदीनुसार 2 लाभार्थ्यांना साहित्य मिळालेबाबत पोहोच नाहीत.

4) 141 लाभार्थ्यांमध्ये केवळ एकच महिला लाभार्थी असल्याने महिला लाभार्थ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. 33 टक्के महिला लाभार्थींना लाभ दिला नाही.

**4.379 अल्पभूधारक शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर चापकटर पुरवठा करणे योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती तासगाव, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती तासगावकडील कृषी विभागामार्फत 50 टक्के अनुदानावर चापकटर पुरवठा करणेसाठी रक्कम रुपये 6,67,500/- खर्च करण्यात आली आहे याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/ प्रमाणक क्रमांक/446/वित्त 3 मंत्रालय मुंबई, दिनांक 20/06/2008 नुसार परिशिष्ट ई मध्ये दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

2**)** महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भासप/1093/ प्र.क्र.1239/37, दिनांक 01/09/1993 नुसार पंचायत समिती गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवलेली नाही. दुबार लाभ दिला असल्याचे नाकारता येत नाही.

3**)** महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक डीपीआर/1088/ सीआर/786, दिनांक 26/11/1989 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले त्याच वित्तीय वर्षात साहित्य वाटप केलेले नाही. दिनांक 31/03/2015 ला 17 चापकटर वाटपविना शिल्लक असल्याचे दिसून येते. त्यामुळे रक्कम रुपये 2,89,000/- गुंतून पडलेली आहे.

4) लाभार्थ्यांचे 100 रुपये स्टॅम्पवर करारनामा केलेला नाही.

5**)** महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास/ प्र.क्रं1239/34, दिनांक 01/09/1993 नुसार वाटप साहित्याचा पर्यवेक्षक यंत्रणेमार्फत खात्री करुन सादर करावयाचा लाभार्थींचा आर्थीक स्थिती अहवाल लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

6**)** महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक परास 1020/प्र.क्र.14/ 38, दिनांक 09/02/2001 नुसार लाभार्थ्यांची निवड करणे आवश्यक आहे.

7**)** चापकटर आयसआय मार्क चे असून तसेच पुरवठा आदेशाप्रमाणे असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र नस्ती सोबत नाही.

8) दरकरारातील अटीनुसार साहित्य प्राप्त झाल्यानंतर 90 टक्के व साहित्य सुस्थितीत प्राप्त झालेची खात्री झाल्यानंतर 10 टक्के रक्कम प्रदान करावयाची आहे. परंतु रक्कम एकाचवेळी प्रदान केली आहे.

9) शासन निर्णय, उद्योग उर्जा कामगार विभाग, भाखस/1088/2512/6,दिनांक 02/01/1992 अन्वये दिलेल्या संस्थेकडून प्राप्त साहित्याचा चाचणी अहवाल घेतलेला नाही.

10) आयकर रक्कम रुपये 13,350/- कपात केलेला नाही.

11) लाभार्थी हिस्याची नोंद नमुना क्रमांक 4 मध्ये ठेवणे आवश्यक आहे परंतु तशी कार्यवाही केलेली नाही.

**4.380 बायोगॅस बांधकामबाबत. (स्वीय निधी)**

**पंचायत समिती खानापुर, जिल्हा सांगली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती खानापुरकडील कृषी विभागाकडून अनुदान तत्वावर बायोगॅस बांधणेकामी रक्कम रूपये 5,47,000/- इतका खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बांधकाम केलेल्या बायोगॅसचा जागेचा नमुना नंबर 8 अ चा दाखला नाही.

2) कृषी अधिकारी व ग्रामसेवक यांचे बांधकाम तपासणी अहवाल नाहीत.

3) संबंधित लाभार्थीकडे जनावरे अस्तीत्वात असले बाबतचे पशुवैदयकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र नाही.

4) बायोगॅस संबंधिच्या आढावा सभेची मासिक वृत्तांत नोंदवही ठेवलेली नाही.

5) गट विकास अधिकारी यांनी भेट व प्रत्यक्ष पाहणी केल्याचा अहवाल नाही.

6) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घेतलेल्या मासिक सभेची वृत्तांत नोंदवही तपासणीस उपलब्ध झाली नाही.

7) बायोगॅस सदयस्थिती नोंदवही ठेवलेली नाही.

8) लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

9) गटविकास अधीकारी यांचेकडुन बँक स्क्रोल प्रमाणीत करण्यात आलेला नाही.

10) दोन लाभार्थींचे जातीचे दाखले प्रस्तावासोबत जोडलेले नाहीत.

**4.381 अनुसूचित जातीमधील लाभार्थींना बैलजोडी वाटप करण्यातील अनियमितता.**

**पंचायत समिती अकोट, जिल्हा अकोला, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती, अकोट चे कृषि विभागाचे अनूसूचित जातीमधील लाभर्थींना रूपये 13,50,000/- बैलजोडी वाटप करण्याची योजना राबविली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्यासाठी संचालक कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे दिनांक 04/05/2013 नुसार नमुद प्रमाणात तपासणी करून तसा अहवाल कृषि आयुक्तालयास दर महा सादर करावयासंबंधी अभिलेखे उपलब्ध झाले नाहीत.

2) लाभर्थ्यांच्या शेतीचा 7/12 व नमुना 8 अ आढळले नसल्याने 6 हेक्टर पेक्षा कमी शेती असल्याबाबत खात्री पटली नाही.

3) आवक नोंदवही उपलब्ध न झाल्याने प्रथम प्राप्त प्राधान्य या तत्वानुसार लाभार्थ्यांची निवड झाल्याची खात्री पटत नाही.

4) लाभार्थींचे मास्टर रजिस्टर ठेवलेले नाही.

**4.382 75 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविण्याची योजना नियमबाहयपणे दुबार राबविणेबाबत.**

**पंचायत समिती रिसोड, जिल्हा वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 32) -** पंचायत समिती रिसोड, सन 2014-15 या वित्तीय वर्षातील पंचायत समिती उपकरातुन 75 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविण्याची योजनेच्या खर्चाकरीता एकुण गुंतलेली रक्कम रुपये 4,98,010/- करीता अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

1) 75 टक्के अनुदानावर सर्वसाधारण शेतकऱ्यांना ताडपत्री पुरविणे योजना पंचायत समिती उपकर मधुन माहे मे 2014 व जुन 2014 या कालावधीत राबविली असतांना पुन्हा तिच योजना राबविण्याबाबत खुलासा करावा. सदर योजना नियोजन करुन एकाच वेळी राबविली नसल्याने जास्त लाभार्थींना लाभ मिळाला नसल्याचे निदर्शनास येते.

2) पंचायत समिती सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 4 दिनांक 21/11/2014 अन्वये पंचायत समितीच्या अंदाजपत्रकानुसार कृषी विभागाकरीता रुपये 4 लाख पेट्रोल स्प्रे पंप करीता राखुन ठेवलेल्या निधीतुन 75 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरविण्याचे ठराव घेण्यात आले. अंदाजपत्रकिय तरतुद नुसार योजनेत बदल करण्याचे प्रयोजन स्पष्ट करणेत यावेत. तसेच विशेष घटक योजनेतुन व पंचायत सेस योजनेतुन ताडपत्री खरेदी या एकाच बाबीवर केलेल्या खर्चाबाबत खुलासा करावा.

3) महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र./446/वित्त-9 दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषदांनी परिशिष्ठ ई मधील नमुद सुचनेनुसार योजना राबविली नाही.

4) योजनेची माहिती ग्राम पंचायतीला मुनादीव्दारे व्यापक प्रसिध्दी होणेबाबत कार्यवाही झाल्याचे निदर्शनास आले नसल्याने योजनेच्या लाभापासुन लाभार्थी वंचीत राहील्याचे दिसुन येते.

5) संबंधित लाभार्थ्याकडे सदर वर्षात ग्रामपंचायत मालमत्ता कराचा भरणा पावती अर्जा सोबत दिसुन येत नाही. तसेच लाभार्थी निवड ग्रामसभेत होणे आवश्यक असतांना तसा ठराव निदर्शनास येत नाही.

6) शासन परिपत्रक पंरास 108/57 दिनांक 19/01/1985 अन्वये लाभार्थी हिस्याची रक्कम भरणाबाबत कोणतेही कार्यवाही करण्यात आली नाही. लाभार्थी हिस्याची रक्कम ताडपत्री खरेदी नंतर भरणा करुन घेण्यात आली. लाभार्थी हिस्सा प्राप्त नसतांना पुरवठा आदेश देण्यात आला याबाबत खुलासा करावा.

7) लेखापरिक्षण कालावधीपावेतो 25 टक्के उर्वरीत रक्कम पुरवठा दारास प्रदान न करता नियमबाहयपणे ठेवीस ठेवण्यात आले. याबाबत खुलासा करावा. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 नियम 50(4) नुसार लाभार्थी हिस्सा जमा घेतल्याबाबत नमुना 10 ची पावती सादर केली नाही.

8) लाभार्थीचे अर्ज प्राप्त झाल्याबाबत कार्यालयाचे आवक क्रमांक व दिनांक नमुद नाहीत.

9) अर्ज तपासणी केली असता अर्जावर 90 टक्के अनुदानावर सन 2013-14 मध्ये ताडपत्री पुरविणे बाबत नमुद आहे. यावरून अर्जाची छाननी करुन अर्ज घेतल्याचे दिसुन येत नाही.

10) साठा नोंदवहीत दिनांकीत स्वाक्षरी व वितरणाच्या नोंद घेण्यात आल्या नसल्यामुळे लेखापरिक्षण दिनांका पावेतो किती ताडपत्री वितरीत केल्याचा बोध होत नाही. तसेच गोषवारे काढून प्रमाणित केले नाही.

11) ग्राम विकास विभाग परिपत्रक क्रमांक 55/34 दिनांक 05/10/1989 नुसार वैयक्तीय लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही वर्षनिहाय व गावनिहाय ठेवण्यात आलेली नाही.

**4.383 75 टक्के अनुदानावर सर्वसाधारण शेतकऱ्यांना ताडपत्री पुरविणे योजनाबाबत.**

**पंचायत समिती मानोरा, जिल्हा वाशिम, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** पंचायत समिती मानोरा उपकराअंतर्गत 75 टक्के अनुदानावर सर्वसाधारण शेतकऱ्यांना ताडपत्री पुरविणे योजनेकरीता प्रशासकीय तसेच तांत्रिक मान्यता प्राप्त् झाल्यानंतर शासन दर करारानुसार लॅमीफॅब ॲण्ड पेपर लिमीटेड औरंगाबाद यांचे कडून ताडपत्री खरेदी करीता सन 2014-2015 मध्ये रुपये 18,98,899/- एवढा खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्र.क्र.446/वित्त्-9 दिनांक 20/06/2008 नुसार योजना राबवितांना वेळापत्रकाचे पालन केलेले नाही.

2) पंचायत समिती उपकर योजना लाभधारका पावेतो व्यापक प्रसिध्दी व शासन निर्देशानुसार ग्रामसभेतुन निवडलेले अर्ज व सुची नुसार लाभार्थी निवड करणे बंधनकारक असतांना लाभार्थी निवडीची विहीत केलेली प्रक्रीया पुर्ण केली नाही. या संबंधिचे इतीवृत्त् सभा कामकाज रजिस्टर मध्ये नोंद तपासणीस उपलब्ध झाली नाही.

3) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक झेडपीए 2000/प्र.क्र.81/33 दिनांक 17/01/2001 व ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक 20/06/2008 नुसार लाभार्थी निवड 30 सप्टेंबर पुर्वी केलेली नाही.

4) पुरवठा आदेश देण्यापुर्वी लाभार्थी हिस्स्याची रक्क्म गोळा केलेली नाही. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 50(4) अन्वये नमुना 10 चे पावती देवुन लाभार्थी हिस्सा जमा करुन एकत्रित रक्कम चलानाव्दारे भरणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5) साहित्याचे पुरवठा आदेश दिनांक 25/03/2015 मधील अट क्रमांक 6 नुसार साहित्य 08/05/2015 पुर्वी पुरविणे आवश्यक असतांना वाहन पावतीवरील दिनांक 25/05/2015 आहे. साठा पुस्तकात 31/03/2015 ला प्राप्त दाखविलेले आहे. याबाबत विसंगती दिसुन येते. पुरवठा आदेश अट क्रमांक 6 नुसार साहित्य 17 दिवस विलंबाने प्राप्त झाल्यामुळे विलंब दंड रुपये 1,49,600/- वसुल होणे आवश्यक ठरते.

6) दुबार लाभ प्रदान होऊ नये म्हणुन गाव निहाय व तालुक निहाय मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

7) तांत्रिक मान्यतेचे शर्तीनुसार लाभार्थीचे निवड न केल्याने केवळ ताडपत्री चलानव्दारे हिस्सा रक्कमा भरणा केलेल्या लाभार्थीस लाभ अदा केल्या जात आहे. त्यामुळे ज्या लाभार्थीस नितांत आवश्यकता आहे असे लाभार्थी लाभापासुन वंचीत राहीलेले आहेत.

**4.384 शेतक-यांना 90 टक्के सुटीवर ताडपत्री पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती बाभुळगाव, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** शेतकऱ्यांना 90 टक्के सुटीवर ताडपत्री पुरविणे योजनेवर रक्कम रुपये 1,98,408/- इतका खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.466/वित्त-9, दिनांक 20/06/2008 मध्ये नमुद तरतुदीनुसार लाभार्थ्याच्या निवडीबाबत वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करण्यात आले नाही.

2) लाभार्थ्यांचे गाव निहाय मास्टर रजिस्टर ठेवण्यात न आल्यामुळे लाभार्थ्यांना दुबार लाभ दिला किंवा कसे याबाबत पडताळणी करता आली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण2007/प्र.क्र. 4871/वित्त-3, दिनांक 04/10/2012 मधील तरतुदीनुसार 3 टक्के निधी अपंगासाठी राखीव ठेवणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4) लाभार्थ्यांना साहित्याचा लाभ त्याच आर्थिक वर्षात देणे आवश्यक असतांना ताडपत्री चे वाटप 2015-16 मध्ये केले आहे. विलंबाने वाटपाबाबत खुलासा आवश्यक आहे.

**4.385 पी.व्ही.सी पाईप चा पुरवठा झालेला नसतांना खर्च नोंदविणे.**

**पंचायत समिती नेर, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1)** - पी.व्ही.सी. पाईप चा पुरवठा योजनेंअंतर्गत रक्कम रुपये 99,933/- खर्च नोंदलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम 1968 चे नियम 27 नुसार तात्काळ प्रदानाची आवश्यकता असल्याशिवाय धनादेश लिहू नये व त्यांवर आहरण संवितरण अधिकारी यांनी स्वाक्षरी करु नये असे असतांना नियमबाहयपणे धनादेश क्रमांक 670684 लिहीण्यात आला. परंतु संबधीतास लेखापरीक्षण पावेतो अदा केलेला नाही.

2) एमएसएसआयडीसी कडून पीव्हीसी पाईपचा पुरवठा झालेला नसतांना दिनांक 31/03/2015 रोजी रक्कम रुपये 99,933/- चा खर्च कसा नोंदविण्यात आला, याचा खुलासा सादर करावा.

3) निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांचे जमिनीचे 7/12 लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झालेले नसल्याने ओलिता योग्य शेती असल्याबाबत खात्री करता आलेली नाही.

4) लाभधारकांची लाभासंदर्भात मास्टर नोंदवही ठेवणेत आलेली नाही तसेच लाभ मिळालेल्या लाभधारकांकडुन फलश्रृती अहवाल उपलब्ध करुन घेण्यात आलेला नाही.

**4.386 75 टक्के अनुदानावर सर्वसाधारण शेतक-यांना एचडीपीई पाईप पुरविणे योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती मारेगाव, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती मारेगाव अंतर्गत उपरोक्त योजना राबविण्याकरीता प्रतिलाभार्थी 10 नग प्रमाणे 116 लाभार्थ्यांना लाभ देण्याकरिता 116 पाईपची खरेदी करण्यात आली आहे. उपरोक्त योजनेवर रक्कम रुपये 4,09,605/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक झेडपीए/ 2008/प्र.क्र.466/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार योजनेची अंबलबजावणी काटेकोरपणे व विहीत कालावधीत पुर्ण करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परीपत्रक क्रमांक परांस/ 1084/सीआर/1622/197 मंत्रालय मुंबई, दिनांक 19/01/1985 नुसार लाभार्थी हिस्याची रक्कम प्रथम वसुल केल्याशिवाय साहित्य खरेदी करु नये असे निर्देश असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

3) पाच लाभार्थ्यांच्या अर्जासोबत 7/12 जोडलेले नाही.

4) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 2 प्रमाणे 45 दिवसाचे आत साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक असतांना पुरवठा करण्यात आला नाही व विलंबाबाबत दंडात्मक कार्यवाही केली नाही.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम 1968 चे नियम 83 (3) नुसार साहीत्य दर्जेदार व योग्यतापुर्ण प्राप्त झाल्याबाबत गटविकास अधिकारी यांनी प्रमाणपत्र नोंदविले नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/ 1096/प्र.क्र.178/05, दिंनाक 09/10/1997 नुसार ज्या वित्तीय वर्षात साहित्य खरेदी केले ते त्याच वित्तीय वर्षात वाटप करणे आवश्यक असतांना सन 2015-16 मध्ये वाटप करण्यात आले आहे.

7) लाभार्थीची निवड ग्रामसभेमार्फत करण्यात आली नाही. मास्टर नोंदवही न ठेवल्यामुळे एकाच लाभार्थीस योजनेचा दुबार लाभ न दिल्याबाबत खात्री करता आली नाही.

8) ओलीताचे क्षेत्रात वाढ झाल्याबाबत व आर्थिक स्थिती सुधारल्याबाबत फलश्रृती अहवाल प्राप्त करुन दर्शवावा.

**4.387 आदिवासी उपयोजना क्षेत्राअंतर्गत बैलजोडी वाटप योजना खर्चावरील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मारेगाव, जिल्हा यवतमाळ, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** आदिवासी उपयोजना क्षेत्राअंतर्गत आदिवासी उपयोजना बाहेरील आदिवासी शेतक-यांना शेतीसाठी अर्थसहाय्य देवून त्यांच्या वैयक्तीक उन्नतीस मदत करणे या हेतूने सदर योजना राबविण्यात येते. उपरोक्त योजनेवर रक्कम रुपये 2,40,000/- ऐवढा खर्च झाला आहे. या योजनेसंबधी आवश्यक अभिलेख्यांची पडताळणी केली असता याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

1) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अंतरिम मार्गदर्शक सुचना आदेश क्रमांक जा.क्र./विप्र-7आऊयो/अंतरिम/मासु/13-14/487/2013, दिनांक 04/05/2013 मधील बाब क्रमांक 3 लाभार्थीची निवड करतांना करावयाच्या कार्यवाहीबाबत सुचना दिलेल्या आहेत परंतू श्री. देविदास नागो आत्राम या लाभार्थ्यांचे प्रस्तावासोबत दुस-याचा नावाचा 8 अ जोडला असतांना लाभ दिला आहे. त्यामुळे सदर रक्कम रुपये 30,000/- संबधीताकडून वसुल होणे आवश्यक आहे.

2) योजनेच्या मार्गदर्शक सुचनेमधील परिशिष्ठ-2 मधील बाब क्रमांक 4.2 नुसार लाभार्थ्यांच्या अर्जासोबत शेतक-यांकडे बैलजोडी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक असतांना याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

3) योजनेच्या मार्गदर्शक सुचनेतील बाब क्रमांक 4.5 नुसार अनुदानाचा गैरवापर करत असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रदद करण्याबाबत आदेश असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4) कृषि अधिकारी मारेगाव यांनी लाभार्थ्यांचे प्राप्त अर्जाची छाननी अचुक व परिपुर्ण केलेली नाही.

5) लाभार्थ्यांच्या उत्पादनात वाढ होऊन आर्थिक प्रगती झाल्याबाबत फलश्रुती अहवाल प्राप्त करुन दर्शवावा.

**4.388 पंचायत समिती उपकरातुन 90% अनुदानावर मागासवर्गीय शेतकऱ्यांना ताडपत्री पुरवठा करणेबाबत.**

**पंचायत समिती मोताळा, जिल्हा बुलढाणा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2008/प्रक्रं-446/ वित्त-9, मंत्रालय मुंबई, 400032 दिनांक 20 जून, 2008 नुसार स्व:उत्पन्नाच्या योजना राबवितांना दिलेल्या वेळापत्रकाची अंमलबजावणी केली नाही.

2) लाभार्थी निवड करतांना निकषानुसार केली नसून नमुद कागदपत्रे पुरवठा दिनांकाची आढळतात.

3) लेखापरीक्षण दिनांकापर्यंत 54 नग वाटप दर्शविले असून 31 नग वाटप करावयाचे शिल्लक आहेत 31 लाभार्थी लाभापासुन वंचित राहीले आहेत.

4) एकाच वित्तीय वर्षात साहीत्य खरेदी व वाटप करणे आवश्यक असतांना तसे केले नाही.

5) मालाचा पुरवठा उशीराने झाल्यानंतर पुरवठादाराकडून 100/- रुपये प्रतिदिन दंड वसुल केला नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक परास-1093 प्रक्रं-1239, दिनांक 01/09/1993 नुसार लाभार्थ्यांची मास्टर नोंदवही न ठेवल्याने एकाच लाभार्थ्यास दुबार लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**4.389 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना ताडपत्री वाटप योजनेतील अनियमितता. (सेस फंड).**

**पंचायत समिती कामठी, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती सेस फंड योजना अंतर्गत शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर ताडपत्री वाटपावर केलेला खर्च रूपये 78,403/- बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेत झाल्याबाबत ठराव तसेच अर्धसमास पत्र क्रमांक 12, दिनांक 23/10/2015 अन्वये मागणी करूनदेखील सात बाराचे नमुने लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही.

2) नस्तीत जोडलेल्या लाभार्थी यादीमध्ये 1 ते 55 क्रमांक असतांना अनुक्रमांक 49, नमुद नाही. त्यामुळे एका ताडपत्रीची रक्कम रूपये 2,851/- वसुलपात्र आहे.

3) लाभार्थ्यांकडून रक्कम वसुली बाबत पावती उपलब्ध न केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे कलम 50(4) चे उलंघन झाले.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे कलम 83(3) नुसार साहित्याच्या गुणवत्तेचे व योग्यतेचे प्रमाणपत्र देण्यात आले नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1082/ 645/266/34 दिनांक 29/07/1989 नुसार योजनेचे मुल्यमापन व फलश्रृती अहवाल नाही.

**4.390 पुरवठयातील विलंबाच्या दंडाची रक्कम वसुल न करणेबाबत. (शासन निधी).**

**पंचायत समिती नरखेड, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, नरखेड सन 2014-15 या वित्तीय वर्षात विशेष घटक योजना (ओ.टी.एस.पी) अंतर्गत 75 एम.एम.चे 1600 नग एच.डी.पी.ई.पाईप रूपये 470/- प्रमाणे खरेदी करण्यात आले असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशातील अट क्रमांक 7 नुसार मागणी नोंदविल्यानंतर 45 दिवसाचे आत पुरवठा होणे आवश्यक असतांना 45 दिवसापेक्षा जास्त कालावधी झाल्याने 3% दंडाची रक्कम रूपये 14,946/- वसुलपात्र आहे.

2) साठा पुस्तकावर साहित्य वाटपाचा दिनांक व सक्षम प्राधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याने महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 चे 'परिशिष्ट ई' नुसार ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे अमंलबजावणी झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

**4.391 ग्रामपंचायत थातुरवाडा, आंबेडकर नगर येथे सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकामातील अनियमितता. (शासन निधी).**

**पंचायत समिती नरखेड, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती नरखेड, सन 2014-15 या वित्तीय वर्षात विशेष घटक योजना (ओ.टी.एस.पी) अंतर्गत 75 एम.एम.चे 1600 नग एच.डी.पी.ई.पाईप रूपये 470/- प्रमाणे खरेदी करण्यात आले असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामपंचायतीला आयकर, विक्रीकर व रॉयल्टी रक्कम रूपये 40,895/- कपात करून बाही रक्कम प्रदान करावयाचे असतांना रूपये 40,895/- सह संपुर्ण रक्कम ग्रामपंचायतीला धनादेशाने प्रदान केली आहे. त्यामुळे सदर रक्कम योग्य त्या शिर्षात जमा झाल्याबाबत खात्री करता आली नाही.

2) सदर काम उशिरा केल्याने दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. मोजमाप पुस्तिकेत कामाचे मुल्याकन मंजूर असल्याबाबत सरपंच व सचिव यांच्या सह्या घेण्यात आल्या नाही. तसेच काम पुर्ण झाल्याचे फोटो नस्तीला लावलेले नाही.

**4.392 50 टक्के अनुदानावर 3 H.P. व 5 H.P. मोटार पंप पुरविणे योजनेतील अनियमितता. (सेस फंड).**

**पंचायत समिती पारशिवनी, जिल्हा नागपूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 9) -** 50 टक्के अनुदानावर पंचायत समिती, सेस फंड योजना अंतर्गत 3 H.P.16 नग व 5H.P. 9 नग मोटार पंप खरेदी रूपये 2,22,000/- खर्चाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी निवड अर्जावर बऱ्याच ठिकाणी लाभार्थी व गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी नाही. तसेच लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेत झाल्याबाबत ठराव क्रमांक नमुद नाही.

2) महाराष्ट्रं शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक पंरास/ 1084/सिआर 1697/97,दिनांक 19/09/1998 अन्वये लाभार्थी हिश्याची रक्कम प्राप्त झाल्याशिवाय साहित्य खरेदी करू नये असे निर्देश असतांना सुध्दा साहित्य खरेदी करण्यात आले आहे.

3) सातबारा उतारा मध्ये विहीर नमुद नाही तसेच विद्युत बिल जोडले नसतांना लाभार्थ्यांवर नियमबाह्य केलेला खर्च 3 H.P. मोटार पंपाची किंमत 16500 x 3 = रुपये 49,500/- वसुलपात्र आहे.

4) लाभार्थी अर्जासोबत सन 2014-15 या आर्थिक वर्षाचा सातबारा उतारा न जोडता जुना सातबारा उतारा जोडला आहे.

5) पंचायत समिती स्तरावर पुरवठा केलेल्या साहित्याची तपासणी केल्याचे दिसून येत नाही.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखंस/ 1013/प्र.क्र.1239/34,दिनांक 2/09/1993 अन्वये मास्टर नोंदवही ठेवण्यात आली नाही.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 चे परिशिष्ट ई नुसार ठरवून दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे अमंलबजावणी करण्यात आली नाही.

**4.393 50% अनुदानावर शेतक-यांना ताडपत्री वाटपातील अनियमितता. (पंचायत समिती सेस फंड).**

**पंचायत समिती देवळी, जिल्हा वर्धा, सन 2014 - 2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती, देवळी जिल्हा परिषद, वर्धा येथील सन 2014-2015 मध्ये 50% अनुदानावर ताडपत्री खरेदी करण्याकरिता रूपये 4,00,000/- एवढया निधीची मंजूरी प्रदान करण्यात आलेली असून, दरकरार क्रमांक HDPR Tarp/WL3/R6/RB0D0000/0154/63/05268/2136, दिनांक 6/9/2013 अन्वये कृषी विभागाचे आदेश क्र. PSDE/Krushi/CESF/BANI-283/2014 दिनांक 28/6/2014 नुसार मे. डेजी इंडस्ट्रीज, मुंबई यांना ताडपत्री पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले आहे. लेखापरिक्षणा दरम्यान खालील त्रुटया आढळून आलेल्या आहेत. त्यावर लेखापरीक्षण अभिप्राय खालील प्रमाणे आहे.

1) पुरवठादाराने ताडपत्री कोणत्या तारखेस पुरवठा केलेली आहे याबाबत साठापंजी तपासली असता त्यामध्ये तारखेत खाडातोड केलेली आहे. त्यामुळे पुरवठा नेमका कोणत्या तारखेस प्राप्त झाला हे स्पष्ट होत नाही.

2) महाराष्ट्र शासन, परिपत्रक ग्रामविकास विभाग, क्रमांक पराख/1084/सीआर 1633/57 सी, दिनांक 11/01/1995 अन्वये लाभार्थी हिस्सा प्रथम वसूल केल्याशिवाय योजना राबवू नये असे असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

3) श्री वसंत तुकाराम धोटे, ब-हाणपूर यांचे आवेदन पत्रात कुठलीही माहिती न भरता स्वाक्षरी करण्यात आलेली आहे.

4) शेख जमील शेख आजम, गुंजखेडा यांनी कुठलाही अर्ज सादर केलेला नसल्याचे दस्तऐवजावरून दिसून येते. लाभार्थ्याची मागणी किंवा अर्ज नसतांना नियमबाह्यपणे लाभ दिलेला आहे.

5) श्री अनिल भालचंद्र देशपांडे बोरगांव भोजनखेडा यांच्या अर्जावर व दस्तऐवजावर स्वाक्षरी नसतांना त्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

6) पांडूरंग नारायण ठाकरे यांचा अर्ज कोरा असून ग्रामपंचायत सचिव यांची शिफारस नाही. तसेच प्रस्ताव मंजुर केल्याबाबत विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी यांच्या स्वाक्षरी नसतांना लाभ देण्यात आलेला आहे.

7) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक, झेडपीए 2008/प्र.क.446/वित्त-9, दिनांक 20 जुन 2008 अन्वये लाभार्थी निवड प्रक्रिया 31 मे पुर्वी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

8) लाभार्थ्यांकडून उपयोगीता प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

9) लाभार्थ्यांना दुबार लाभ न दिल्याबाबत मास्टर नोंदवही ठेवलेली नाही.

**4.394 50 टक्के अनुदानावर ताडपत्री पुरवठा करणेबाबत. (पंचायत समिती सेस फंड)**

**पंचायत समिती सेलु, जिल्हा वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 6) -** प्रमाणक क्रमांक 22, दिनांक 31/03/2015 रक्कम रुपये 7,98,246/- लॅमीफॅब ॲन्ड पेपर्स प्रा. लिमिटेड यांना प्रदान करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पुरवठा आदेशामध्ये कोणत्या तारखेपर्यंत पुरवठा करावयाचा आहे. याबाबत दिनांक नमुद नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/163/57 दिनांक 19 जानेवारी 1985 नुसार लोकवर्गणी वसूल झाल्याशिवाय साहित्याचे वाटप करु नये असे असताना लाभार्थी हिस्सा कोणत्या तारखेत वसूल केला याची नोंद नस्तीमध्ये नाही.

3) महाराष्ट्र शासन, परिपत्रक क्रमांक, परास-108/सीआर/1074/57 दिनांक 29/7/1983 नुसार योजनेचे उद्दिष्ट सफल झाल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र जोडलेले नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/वित्त दिनांक 20/6/2008 प्रमाणे खरेदीपुर्वी लाभार्थी निश्चितीसह योग्य ते नियोजन करुन प्रस्ताव अंतिम केलेले नाहीत व विहित मुदतीत वेळेत लाभ देण्याचे वेळापत्रकानुसार कार्यवाही केलेली नाही.

5) लेखापरीक्षण कालावधी अखेर 11 नग शिल्लक असल्याने नाहक रुपये 35,682/- गुंतून पडलेले आहेत.

6) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास शासन निर्णय क्रमांक भाखंस/1093/प्र.क्र.1239/34 दिनांक 1/9/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 नुसार लाभार्थ्यांची गावनिहाय मास्टर रजिस्टर ठेवलेले नाही.

**4.395 लेखापरीक्षणास अभिलेखे सादर न केल्याबाबत.**

**पंचायत समिती कारंजा, जिल्हा वर्धा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** जलपूर्ती धडक सिंचन विहिर योजना अंतर्गत अभिलेखे सादर करण्यात आले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) जलपूर्ती योजना धडक सिंचन विहीरीवर सन 2014-2015 मध्ये झालेला खर्च रुपये 15,41,122/- रकमेचे विहीरीवर प्रत्यक्षात केलेल्या कामाच्या खर्चाचे मोजमाप पुस्तिका, विहीरीच्या कामाचे प्रस्ताव, पुर्ण-अपुर्ण कामाची यादी व सदर योजनेसंबंधी इतर सर्व अभिलेखे सादर करण्यात आले नाही.

2) सिमेंट रस्ता बांधकाम किन्हाळा मोजमाप पुस्तीका क्रमांक 723 लेखापरीक्षणास सादर करण्यात आली नाही.

3) सन 2014-2015 योजना निहाय पुर्ण अपुर्ण बांधकामाची यादी लेखापरीक्षणास सादर नाही.

**4.396 50 टक्के अनुदानावर ताडपत्री खरेदीबाबत (सेस फंड)**

**पंचायत समिती साकोली, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 1)** - कृषि विभागाने पंचायत समिती, सेस फंड योजनेअंतर्गत 50 टक्के अनुदानावर ताडपत्री खरेदीवर रुपये 1,98,681/- चा खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक -1093/ प्र. क्र. 178/ 05, दिनांक 09/10/1997 नुसार आयएसआय दर्जाची 200 जी.एस.एम ताडपत्री खरेदी करणे आवश्यक असतांना, कृषि विभागाने 370 जी. एस. एम. ताडपत्री जादा साईजची खरेदी केल्यामुळे रुपये 3,516.46-1,900.08=1,615.66/- प्रमाणे 113 नगाचे रुपये 1,82,569.58/- चे जादा खर्च झालेला आहे. जादा झालेला खर्च वसुल करणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 (1 व 3) अन्वये प्राप्त झालेली ताडपत्री योग्य दर्जाची पुरवठा केल्याबाबत शासन मान्य संस्थेकडुन चाचणी करणे आवश्यक आहे. परंतु त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1084/सी आर 1633/578, दिनांक 19/01/1995 नुसार प्रथम लाभार्थी हिस्सा वसुल करुन साहित्य खरेदी करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास / 1093/ प्र. क्र. 1239/ 34, दिनांक 01/09/1993 नुसार मास्टर नोंदवही न ठेवल्याने डबल लाभ लाभार्थ्यांना झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए /2008/ प्रक्र446, दिनांक 20/06/2008 मधील वेळापत्रानुसार योजना राबविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

6) आयकर अधिनियम 194(सी) नुसार रुपये 3,97,362/- च्या 2 टक्के प्रमाणे आयकर रक्कम रुपये 7,947/- वसुल करुन शासनाकडे भरणा केलेला नाही.

**4.397 50 टक्के अनुदानावर लाभार्थ्यांना ताडपत्रीच्या वाटपाबाबत. (सेस फंड)**

**पंचायत समिती लाखनी, जिल्हा भंडारा, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3)** - कृषी विभागाने 50 टक्के अनुदानावर लाभार्थ्यांना 227 ताडपत्रीच्या वाटपावर प्रमाणक क्रमांक 13, दिनांक 09/02/2015 नुसार एकुण रुपये 39,555/- एवढा खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, झेडपीए/ 2008 दिनांक 20/06/2008 अन्वये जिल्हा परिषदेने राबविण्यात येणा-या विविध योजनाचे नियोजन व अंमलबजावणीचे वेळापत्रकाकडे दुर्लक्ष करुन योजना राबविली गेली.

2) सदर योजनेकरिता महिलांना 30 टक्के लाभ दिला नाही.

3) सदर योजनेकरिता अपंगान 3 टक्के लाभ दिला नाही.

4) शासन निर्णय, कृषी व पशु विभाग, दिनांक 19/09/2000 नुसार निवड केलेल्या लाभार्थ्यास दिनांक 01/05/2001 नंतर अपत्याची संख्या 3 पेक्षा जास्त नसल्याचे प्रमाणपत्र नाही.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक - 1093/178/05 दिनांक 09/10/1997 अन्वये आयएसआय मार्कची कमी दराची वस्तु /साहित्य खरेदी करणे बंधनकारक असतांना विभागाने 370 जीएसएम प्रकारची रुपये 1,798.25/- प्रती नग दराची ताडपत्री खरेदी केली. जी 200 जीएसएम प्रकारची आयएसआय मार्क दराची रुपये 1,584/- प्रती नग खरेदी होणे असता (1758.25 -1584) = 174.25/- जादा दराने खरेदी केल्यामुळे 227 नग ताडपत्रीकरीता रुपये 39,555/- जादा खर्च निधीतुन केला आहे.

6) डिलीव्हरी चलानवर दिनांक नमुद नाही.

7) लाभार्थी हिस्सा वसुल केला नाही.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक मागास / 1093/ प्र. क्र. 1239/ 34, दिनांक 01/09/1993 नुसार मास्टर नोंदवही न ठेवल्याने डबल लाभ लाभार्थ्यांना झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**4.398 100 टक्के अनुदानावर शेतक-यांना बैलजोडी वाटपाबाबत.**

**पंचायत समिती तिरोडा, जिल्हा गोंदिया, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** सन 2014-2015 मध्ये 100 टक्के अनुदानावर अनुसुचीत जमाती अंतर्गत उपयोजना (TSP) अनुसुची जमातीबाहेरील उपयोजना (OTSP) विशेष घटक योजना अंतर्गत वाटपामध्ये लाभार्थी शेतक-यांना बैलजोडी वाटपाकरीता एकुण रुपये 15,95,486/- अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाथार्थ्यांची मास्टर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे दुबार लाभ झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) लाभार्थ्यांची निवड विहित निकषानुसार झाल्याबाबत लेखापरीक्षणाची खात्री पटलेली नाही.

3) बैलजोडी खरेदीबाबतचे धनादेश संबंधीत लाभार्थ्यांचे नावाने देण्यात आले नाही.

4) विम्याची रक्कम भरणा पावती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

5) अभिकरण शुल्क भरणा रुपये 73,595/- बाबत पावती सादर केली नाही.

6) अभिकरण शुल्क रुपये 2,500/- कमी भरणा केलेला आहे.

**4.399 अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर चिनीमातीचे पाईप पुरविणेबाबत.**

**पंचायत समिती एटापल्ली, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती सेस फंड अंतर्गत शेतकऱ्यांना 100 टक्के अनुदानावर चिनी मातीचे पाईप पुरविण्यासाठी प्रमाणक क्रमांक 07 दिनांक 31/03/2015 रक्कम रूपये 49,250/- खर्च करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक-झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, मंत्रालय, मुंबई, दिनांक 20/06/2008 मधील बाब क्रमांक 3, परिशिष्ट- ई नुसार वैयक्तीक लाभार्थी योजनेची कार्यवाही वेळापत्रकानुसार करावयाची असतांना दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. (उदाहरण योजनेस तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी दिनांक 30 जुन पर्यंत घेणे आवश्यक असतांना सदर योजनेला माहे ऑक्टोबर व डिसेंबर-2014 मध्ये मंजुरी घेण्यात आल्याचे आढळले. तसेच लाभार्थ्यांची निवड दिनांक 31 मे 2014 अखेर पर्यंत करणे आवश्यक असतांना माहे डिसेंबर-2014 ला केल्याचे दिसुन आले. आणि साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश दिनांक 30 सप्टेंबर पर्यंत देणे आवश्यक असतांना, माहे जानेवारी मध्ये देण्यात आल्याचे आढळले. तसेच लाभार्थ्यांना साहित्यांचे वाटप दिनांक 30 नोव्हेंबर पर्यंत करणे आवश्यक असतांना लेखापरिक्षण कालावधी पर्यंत म्हणजे दिनांक 15/09/2015 पर्यंत वाटप केले.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83(3) नुसार पुरवठा आदेशाप्रमाणे खरेदी केलेल्या साहित्याचा तपासणी अहवाल शासकीय प्रयोगशाळेकडून किंवा कंपनीकडून प्राप्त केल्याबाबत अभिलेख्यात आढळला नाही. त्यामुळे पुरवठा केलेले चिनी मातीचे पाईप 675 नग योग्य दर्जाचे असल्याबाबतची खात्री करता आले नाही. सभेने निवड केलेल्या 70 लाभार्थ्यांना योजनेचे साहित्य वाटप करण्यात आल्याचे साठापुस्तकावरून दिसुन येते. परंतु संबंधीत लाभार्थी त्याचा उपयोग घेत असल्याबाबत संबंधीतांचे स्वाक्षसीसह उपयोगिता प्रमाणपत्र घेण्यात आल्याचे अभिलेख्यात आढळले नाही.

3) लाभार्थ्यांना दरवर्षी विविध योजने अंतर्गत लाभ देण्यात येतो परंतु लाभार्थ्यांची मास्तर नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. त्यामुळे एकाच लाभार्थ्याला दुबार लाभ दिला नसल्याची खात्री करता आले नाही. तरी सक्षम अधिकारी यांचे स्वाक्षरीसह मास्तर नोंदवही अदयावत करून प्रमाणित करावे.

**4.400 नाविण्यपुर्ण योजनाअंतर्गत लाभार्थ्यांना 100 टक्के आर्थिक सहाय्य करणेबाबत.**

**पंचायत समिती एटापल्ली, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** नाविण्यपुर्ण योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना 100 टक्के आर्थीक सहाय्य करण्यासाठी विद्युतीकरण न झालेल्या गांवातील शेतकऱ्याचे विहीरीवर सौर उर्जेव्दारे कृषी पंपाचे उर्जीकरण करणे त्यासाठी 22,05,000/- एवढा खर्च करण्यात आला. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) लाभार्थी निवड करतांना मेडामार्फत उर्जीकरणासाठी हस्तांतरीत गांवातील शेतकरी असावा अशी अट घालुन देण्यात आलेली आहे. परंतु मेडा मार्फत उर्जीकरणासाठी हस्तांतरीत गांवातील शेतकऱ्यांची यादी सादर केली नाही. त्यामुळे निकषानुसारच लाभार्थ्यांची निवड झाल्याची सत्यपना करता आले नाही.

2) प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजुरीच्या अटी/शर्तीनुसार लाभार्थी अर्जासोबत रूपये 100/- हे हमीपत्र असणे आवश्यक आहे. परंतु 2 लाभार्थ्यांचे (श्री.दागू मादी मट्टामी व श्री.दलसु महारू तलांडे) हमीपत्र अभिलेख्यात आढळले नाही.

3) करारनाम्यातील अट क्रमांक 2 नुसार यशस्वी चाचणी संबंधीत लाभार्थी व सहाय्यक अभियंता (यांत्रिकी, कृषी अधिकारी, सामान्य) यांची संयुक्तरित्या तपासणी केल्यानंतरच 90 टक्के टक्के रक्कमेचे देयक संबंधीत पंचायत

समितीकडे सादर करावे अशी अट घालुन दिले आहे. अणि अट क्रमांक 3 नुसार उर्वरित 10 टक्के रक्कम सौर उर्जेवरिल पंप सुरू झाल्यापासुन एक महिन्याच्या यशस्वी संयुक्त तपासणीनंतरच देयक अदायगीबाबत कार्यवाही करण्यात यावी असे असतांना फक्त एकच यशस्वी चाचणी/संयुक्त तपासणी केले असुन, त्या संयुक्त तपासणी अहवालावर दिनांक नमुद केलेला नाही. त्यामुळे संयुक्त चाचणी/तपासणी कधी करण्यात आली याबाबतची खात्री करता आले नाही. तसेच एकच संयुक्त तपासणी केली असतांना संबंधिताला परिपुर्ण रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

4) पुरवठा आदेश व करारनाम्यातील अट क्रमांक 6 मध्ये उशीरा पुरवठाबाबत नुकसान भरपाईची जबाबदारी सर्वस्वी पुरवठादाराची राहील असे नमुद केले आहे. परंतु कशा प्रकारे किती रक्कम नुकसान भरपाई कपात करावे असे सुचविले नसल्यामुळे खरेदी नियमपुस्तीका “मॅन्युअल ऑफ ऑफीस प्रोसिजर फॉर परचेस ऑफ स्टोअर्स बाय दि गर्व्हमेंट डिपार्टमेंट” पार्ट-5 चे नियम 2.4, अपेंडिक्स-17 (पेज नंबर 74) नुसार दंडाची आकारणी करून रक्कम कपात करणे बंधनकारक असतांना साहित्याचा पुरवठा हा 45 दिवसाचे आत (दिनांक 25 मार्च 2014 पर्यंत) करणे आवश्यक असतांना दिनांक 11 जुन 2014 ला म्हणजे 77 दिवस (म्हणजे 11 आठवडे) अशीराने होऊनही दंडाची रक्कम देयकातुन कपात केली नाही. त्यामुळे संबंधीताकडून रक्कम रूपये 1,21,275/- (2205000 x 11 x 0.5% = 1,21,275/-) वसुल करून निधीत जमा करावे.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेड.पी.ए-2009/प्र.क्र./514/वित्त-9, दिनांक 20/09/2009 मधील तरतुदीनुसार स्टॅम्प पेपरवर रूपये 1,300/- ऐवजी रूपये 100/- वर करारनामा केल्याने रूपये 1,200/- ने शासन महसुलाची हानी झालेली आहे.

6) संबंधित लाभार्थ्यांना प्राप्त झालेले साहित्य हे व्यवस्थीत/सुरळीत चालु असुन, त्याचा लाभ घेत असल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र अभिलेख्यात आढळले नाही.

**4.401 75 टक्के अनुदानावर काटेरी तार खरेदी वाटप खर्चातील अनियमितता. (सेस फंड)**

**पंचायत समिती मुलचेरा, जिल्हा गडचिरोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 2) -** अल्पभूधारक शेतकऱ्यांना 75 टक्के अनुदानावर काटेरी तार खरेदी करुन वाटप करणे यावर रूपये 1,23,606/- एवढा खर्च फ़करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) काटेरी तार प्राप्त दिनांक 02/03/2015 ला 21.00 क्विंटल साठा पुस्तकाला नोंद घेण्यात आलेली आहे. परंतु त्यांचे वाटप दिनांक 24/04/2015 ते 28/05/2015 पर्यंत करण्यात आल्याने त्याच वर्षात लाभार्थीस लाभ प्राप्त झालेला नाही. शासन परिपत्रक क्रमांक परास-1096/ प्र.क्र.178/05, दिनांक 07/10/1997 नुसार योजनेअंतर्गत साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात करने आवश्यक आहे. परंतु वरिलप्रमाणे त्याच आर्थिक वर्षात साहित्याचे वाटप केल्याचे आढळुन आलेले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए 2000/प्र.क्र.41/33, दिनांक 10 जानेवारी 2001 मध्ये नमुद केल्यानुसार योजनेत लाभार्थी निवडीपासुन ते प्रत्यक्ष लाभ देण्यापर्यंत वेळापत्रक पाळण्यात आले नाही. त्यामुळे योजनेचा लाभार्थींना विहीत कालावधीत लाभ प्राप्त झाला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रमाविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक 1089/प्र.क्र.553, दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थी मास्टर रजिस्टर ठेवुन त्यात लाभार्थीस दुबार लाभ दिला नसल्याची पडताळणी करता आली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 50(4) नुसार 25 टक्के वसुल रक्कमेची पावती देणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही पंचायत समितीव्दारे झालेली नाही. लेखासंहितेचे पालन पंचायत समितीने केलेले नाही.

**4.402 विशेष घटक योजनेतंर्गत बैलजोडी खरेदीबाबत. (राज्य क्षेत्र निधी).**

**पंचायत समिती परतुर, जिल्हा जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** कृषि विकास अधिकारी, जिल्हा परीषद, जालना जा.क्र.जिपजा/विघयो/ बैलजोडी/वि.प्र. 1573, दिनांक 24/07/2014 अन्वये रक्कम रुपये 90,000/- अनुदान देण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) श्री केरभान शाम मुंढे यांचे लाभार्थी मंजुर यादीत नाव नसंताना त्यांना लाभ दिल्याचे लेखापरीक्षणास आढळुन आले संबंधिताकडुन रुपये 30,000/- वसुल करुन अनुपालन दर्शवावे.

2) लाभार्थीची मंजुर यादी लेखापरीक्षणास सादर करण्यात आली. परंतु लाभार्थ्यांचे प्रस्ताव लेखापरीक्षणास सादर करण्यात आले नाही. त्यामुळे कृषि विभाग शासन निर्णय दिनांक 09/11/2011 प्रमाणे प्रस्तावासोबत आवश्कती ती कागदपत्रे असल्याची खात्री लेखापरीक्षणास झाली नाही.

**4.403 वाहन दुरुस्तीवरील अनियमिततेबाबत. (राज्य क्षेत्र निधी).**

**पंचायत समिती घनसावंगी, जिल्हा जालना, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदर वाहन दुरुस्तीवर रक्कम रुपये 63,562/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) ग्रामविकास विभाग व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक जेईपी-10/2002/ प्र.क्र.147/पंरास-1 मंत्रालय मुंबई 32, दिनांक 11/01/2010 नुसार डिझेल वाहनावर वार्षिक दुरुस्ती खर्च मर्यादा रुपये 50,000/- एवढी आहे. परंतु सादर वाहनावर वार्षिक दुरुस्ती खर्च रुपये 63,562/- केलेला आहे. त्यामुळे जास्तीचा खर्च रुपये 13,562/- लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

2) सर्वसाधारण 40 हजार कि.मी. एवढी धावसंख्या झाल्यानंतर वाहनाचे टायर / टयुब बदलण्याची आवश्यकता असेल तर बदलावेत. परंतु याबाबत सक्षम अधिकाऱ्याचा तांत्रिक अहवाल लेखापरीक्षणात दर्शविण्यात आला नाही. त्यामुळे टायरची धावसंख्या 40 हजार झाल्याची खात्री होवु शकली नाही.

3) टायरची नोंद लॉग बुक पान क्र. 51 वर घेण्यात आली परंतु लेखासंहिता 1968 चे नियम 94 (4) व 95(3) नुसार नमुना 38 मध्ये नोंद ठेवणे आवश्यक असताना अशी नोंद घेण्यात आलेली नाही.

4) जुने टायर्सची नोंद साठा नोंद वहीत घेतल्याची नोंद दर्शविण्यात आली नाही. त्यामुळे जुने टायर्सची विल्हेवाट कशी लावली याबाबत खात्री होवु शकली नाही.

5) प्रमाणक क्रमांक 1, दिनांक 08/09/2014 अन्वये वाहनाचा विमा काढण्यासाठी न्यु इंडीया इश्योरन्स जालना यांचे मागणी दिनांक 05/09/2014 नुसार रक्कम प्रदान करण्यात आली. परंतु सदर वाहनाची विमा पॉलीसी लेखापरीक्षणात दर्शविण्यात आली नाही.

6) इतिहास पुस्तिकाचे पहिले पृष्ठ क्रमांकावर वाहनाची जी सविस्तर माहिती भरावयाची असते ती भरलेली नाही.

**4.404 पंचायत समिती पाथरी अंतर्गत विशेष घटक योजना (SCP) व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना (OTSP) अंतर्गत करण्यात आलेल्या विहीर बांधकामातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती पाथरी, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 54) -** पंचायत समिती, पाथरीचे सन 2014-15 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात विशेष घटक योजनेअंतर्गत व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना या योजने अंतर्गत निवड लाभार्थींना विहीरीचा लाभ देण्यात आला असुन यावर रुपये 32,673/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा निवड समिती, जिल्हा परिषद, परभणी यांचे आदेश क्रमांक जिप/कृषि/विघयो निवड यादी/950/12, दिनांक 11/05/2012 व जिप/कृषि/विघयो पुनि यादी/2099/12, दिनांक 29/10/2012 मधील लाभार्थी निवडीच्या 01 ते 10 अटी व शर्तीच्या अधीन राहुन पात्र लाभार्थीची निवड केली असल्याचे सुयोग्य अभिलेख्या अभावी प्रमाणित करता येत नाही.

2) कृषि आयुक्तालय यांचे पत्र क्रमांक विप्र-5/आऊयो/भासु/09-10/482/2009, दिनांक 27/07/2009 मधील अंतिम मार्गदर्शक सुचना परिशिष्ट-2(10) नुसार भुजल सर्वेक्षण यंत्रणेच्या निकषानुसार विहीरींच्या स्थळांच्या योग्यता (Feasibility report) रिपोर्ट करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही न करता रेखांकन देवुन कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

3) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक मग्रारो-2011/प्र.क्र.24/रोहयो-10अ,दिनांक 10/03/2011 मधील परिच्छेद 4 नुसार विहीरींना मंजुरी देतांना भुजल सर्वेक्षण यंत्रणेकड्डुन त्यांच्या निकषाप्रमाणे पाण्याच्या उपलब्धतेबाबत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

4) वरील शासन निर्णयातील परिच्छेद 2 नुसार विहीरीच्या कामाचे तांत्रिक मापदंड निश्चित करण्यात आले आहे. आकारमान तथापि भुस्तरनिहाय विहीरीचे मापदंड निश्चित केले असले तरी प्रत्येक भागाची स्थानिक / भौगोलीक स्थिती भिन्न असते तेव्हा पंचायत विभागांतर्गत घेण्यात आलेल्या संपुर्ण विहीरीसाठी एक ठराविक अंदाजपत्रक / विहीरीचे आकारमान एकाच तांत्रिक मापदंडात कोणत्या आधारे निश्चित करण्यात आले हे समजून येत नाही.

5) प्रत्येक विहीर ही स्वतंत्र काम असल्याने त्यास लाभार्थीनिहाय वेगवेगळी तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

6) कृषि आयुक्तालय यांचे पत्र क्रमांक विप्र-5/आऊयो/भासु/09-10/482/2009,दिनांक 27/09/2009 मधील मार्गदर्शक सुचना परिशीष्ट 3(11) नुसार योजनांचे अंमलबजावणी यशस्वीरित्या होत असल्याबाबत तपासणी करुन अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तथापि अशा मार्गदर्शक सुचनांचे पालन केले बाबतचे अभिलेखे दर्शविण्यात आले नाही. त्यामुळे योजनेच्या फलश्रुतीबाबत तपासणी करता आली नाही.

7) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक 1611/प्र.क्र.112/4-ए, दिनांक 30/05/2011 मधील परिच्छेद 4(2) नुसार योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडुन करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

8) मोजमापन पुस्तीकेची मागणी करुनही मोजमापन पुस्तीका तपासणीसाठी उपलब्ध करुन दिल्या नसल्यामुळे मुल्यांकनाची व मोजमापन पुस्तीकेतील इतर नोंदीबाबतची तपासणी करता आली नाही.

9) कृषि आयुक्तालय, पुणे यांचे आदेश क्रामंक विघयो/मासु/विप-2005, दिनांक 20/06/2005 प्रमाणे पुर्ण झालेल्या विहीरीच्या नोंदी 7/12 वर घेतल्या नाहीत. त्यामुळे कामे झाल्याचे प्रमाणित करता येत नाही.

10) शासन निर्णय दिनांक 02/09/1993 मधील परिच्छेद क्रमांक 4 व परिपत्रक दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थीची गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. अशी नोंदवही ठेवण्यात आली नाही.

11) कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक 20/06/2005 मधील मार्गदर्शक सुचना नुसार लाभार्थी यांना दिलेल्या लाभाबाबत पंचायत समिती निहाय अनुदानाची नोंदवही ठेवलेली नाही. तसेच विहीरीच्या कामाची तपासणी जिल्हा कृषि अधिकारी (विशेष घटक योजना) / जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केलेली नाही.

**4.405 कृषि गोदामातील विना वाटप पडुन असलेल्या साहित्याबाबत.**

**पंचायत समिती गंगाखेड, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 50) -** पंचायत समिती, गंगाखेड अंतर्गत लेखापरीक्षणात सादर केलेल्या कृषि गोदाम साठा नोंदवहीची तपासणी केली असता आक्षेपामध्ये नमूद केलेल्या तपशिलानुसार विविध 53 कृषि औजारे वाटपाविना शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 98(3) अनुसार गट विकास अधिकारी यांनी दरवर्षी जूनमध्ये साठा नोंदवहीची पडताळणी करुन विहीत नमुन्यात प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना पाठवणे आवश्यक आहे. परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे शिल्लक साठ्याचा गैर वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) विहीत वेळापत्रकानुसार योजना न राबविल्यामुळे व उद्दिष्ट पूर्तीसाठी व्यवहार्य नियोजन न केल्यामुळे वाटपाअभावी शिल्लक राहिलेल्या साहित्यामुळे नाहक शासननिधीची रक्कम रुपये 3,18,435/- गुंतून पडलेली आहे.

**4.406 विशेष घटक योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या विहीरीच्या अनुदानातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सेलु, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समीती, सेलू मध्ये सन 2014-2015 या वित्तीय वर्षामध्ये विशेष घटक योजने अंतर्गत विहीर बांधण्याकरीता आक्षेपात दर्शवलेल्या तपशिला प्रमाणे लाभार्थ्यांना रुपये 3,53,043/- इतके अनुदान वाटप करण्यात आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक विप्र-5/आऊयो/भासु/09-10/482/2009, दिनांक 27/07/2009 मधील अंतिम मार्गदर्शक सुचना परीशीष्ट 2 (10) नुसार भूजल सर्वेक्षण यंत्रणेच्या निकषानुसार विहीरीच्या स्थळाच्या योग्यता (Feasibility Report) अहवाल करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही केल्या बाबत अभीलेखे दर्शविण्यात आलेली नाहीत.

2) नियोजन विभाग, शासन निर्णय कमांक मग्रारो-2011/प्रक्र-24/रोहयो-10अ, दिनांक 10/03/2011 मधील परिच्छेद 4 नुसार विहीरींना मंजूरी देताना भूजल सर्वेक्षण यंत्रणेकडून त्याच्या निकषाप्रमाणे उपलब्धेबाबत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही केल्याबाबत अभीलेख्या अभावी तपासणी करता आली नाही.

3) वरील शासन निर्णयातील परिच्छेद 2 नुसार विहीरीच्या कामाचे तांत्रीक मापदंड आकारमान 4.50 मीटर X 15 मीटर निश्चीत करण्यात आले आहे. तरी प्रत्येक भागाची स्थानिक/भौगोलीक स्थीती भीन्न आहे. तेव्हा पंचायत विभागांतर्गत घेण्यात आलेल्या संपूर्ण विहीरीसाठी एक ठराविक अंदाजपत्रक/विहीरीचे आकारमान एकाच तांत्रीक मापदंडात कोणत्या आधारे निश्चीत करण्यात आले याबाबत बोध होत नाही.

4) प्रत्येक विहीर ही स्वतंत्र काम असल्याने त्यास लाभार्थी निहाय वेगवेगळी तांत्रीक मंजूरी घेणे आवश्यक आहे. मात्र अशी कार्यवाही करण्यात आली नाही.

5) कृषी आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रमांक विप्र-5/आऊयो/भासु/09-10/482/2009, दिनांक 27/07/2009 मधील मार्गदर्शक सुचना परिशीष्ट 3 (11) नुसार योजनेचे अमलबजावणी यशस्वीरीत्या होत असल्या बाबत तपासणी करुन अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तथापि अशा मार्गदर्शक सुचनांचे पालन केलेबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणात दर्शविण्यात आले नाही. त्यामुळे योजनेच्या फलश्रुतीबाबत पडताळणी करता आली नाही.

6) महाराष्ट्र शासन, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक 1611/प्र.क्र.112/4-ए, दिनांक 03/05/2011 मधील परिच्छेद 4(2) नुसार योजनेचे मुल्यमापन त्रयस्थ यंत्रणेकडून करुन घेणे आवश्यक आहे. तथापि अशी कार्यवाही झालेली नाही.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 166 (3) नुसार मोजणी विषयीची प्रत्येक नोंद मोजमाप पुस्तीकेत घेताना मोजणीचा दिनांक, बांधकामाचे पुर्ण नांव, बांधकामाची जागा, करारनाम्याचा क्रमांक व दिनांक, प्रशासकिय मान्यता, तांत्रीक मान्यता, कार्यारंभ आदेश क्रमांक, कार्यपूर्ती दिनांक इत्यादी सर्व बाबींचा तपशील मापनपुस्तीकेत नोंदवविणे आवश्यक आहे. परंतु मापनपुस्तीकेत फक्त लाभधारकाचे नांव व गावाचे नांव नोंदविण्यात आलेले आहे.

8) कृषि आयुक्तालय, पुणे यांचे आदेश क्रमांक विघयो/मासू/विप-2005, दिनांक 20/06/2005 प्रमाणे पूर्ण झालेल्या विहीरीच्या नोंदी 7/12 वर घेतल्या बाबत अभिलेखे लेखापरीक्षणास दर्शविले नाहीत. त्यामुळे सदरील कामे झाल्याचे प्रमाणित करता येत नाही.

9) महाराष्ट्र शासन निर्णय दिनांक 02/09/1993 मधील परिशिष्ट क्रमांक 4 व परिपत्रक दिनांक 05/10/1989 नुसार लाभार्थीची गावनिहाय मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशी नोंदवही लेखापरीक्षणास न दर्शविल्याने योग्य ती पडताळणी करता आली नाही.

10) कृषि आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक 20/06/2005 मधील मार्गदर्शक सुचनानुसार लाभार्थी यांना दिलेल्या लाभाबाबत पंचायत समिती निहाय अनुदानाची नोंदवही ठेवलेली नाही तसेच विहीरीच्या कामाची

तपासणी जिल्हा कृषि अधिकारी (विशेष घटक योजना) व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केली असल्या बाबत अभीलेख्या अभावी पडताळणी करता आलेली नाही.

**4.407 गोदामामध्ये विनावाटप पडुन असलेल्या साहित्याबाबत.**

**पंचायत समिती पालम, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 13) -** पंचायत समिती पालम अंतर्गत लेखापरीक्षणात सादर केलेल्या कृषी गोदाम साठा नोंदवहीची तपासणी केली असता आक्षेपामध्ये नमूद केलेल्या तपशिलानुसार विविध 138 कृषि औजारे वाटपाविना शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 98 (3) अनसार गट विकास अधिकारी यांनी दरवर्षी जूनमध्ये साठा नोंदवहीची पडताळणी करुन विहीत नमुन्यात प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना पाठवणे आवश्यक आहे परंतु अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे शिल्लक साठ्याचा गैर वापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

2) विहीत वेळापत्रकानुसार योजना न राबविल्यामुळे व उद्दिष्ट पूर्तीसाठी व्यवहार्य नियोजन न केल्यामुळे वाटपाअभावी शिल्लक राहिलेल्या साहित्यामुळे नाहक शासननिधीची रक्कम रुपये 4,39,018/- गुंतून पडलेली आहे.

**4.408 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर पावर स्प्रे पंप खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सोनपेठ, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती सोनपेठ ने सन 2014-15 या वित्तीय वर्षामध्ये पंचायत समिती उपकरातुन शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर पावर स्प्रे पंप 70 नग खरेदी पोटी रुपये 1,78,500/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9,दिनांक 31/01/2013 मधील टीप 1 व 4 प्रमाणे पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव दिसुन येत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 126 अन्वये पावर स्प्रे पंप खरेदी प्रतिनग 5,100/- या दरास पंचयत समितीने मान्यता दिलेबाबतचा ठराव दिसुन आलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर योजना राबविण्यासाठी विहित वेळापत्रकानुसार अंमलबजावणी विहित केलेली आहे. त्यानुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळाले नंतर व लाभार्थी निवडीची प्रक्रीया सर्वार्थाने पुर्ण करुन त्यांचे कडुन लोकवाटा / हिस्स्याची रक्कम जमा करुनच साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश देणे आवश्यक आहे. तथापि पंचायत समितीने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) सदर योजनेस उपरोक्त शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत पातळीवरुन प्रसिध्दी देऊन इच्छुक लाभधारकाकडुन अर्ज मागवुन प्राप्त अर्जातुन अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या लाभार्थीची निवड करुन त्यास पंचायत समितीची मान्यता घेऊन लाभ देणे आवश्यक होते. तथापि अशी कार्यपध्दती न अवलंबिता जशी जशी लाभार्थीकडुन मागणी आली त्याप्रमाणे त्यांचे कडुन लोकवाटा जमा करुन तसे पावर स्प्रे पंपाचे वाटप केल्याचे दिसुन येते, त्यामुळे अवलंबिलेली प्रक्रीया वित्तीय औचीत्यास अनुसरुन नाही.

5) उपरोक्त शासन निर्णयान्वये लाभार्थी निवड करुन त्यांचे कडुन लाभार्थी हिश्याची रक्कम रुपये 1,78,500/- अगोदर जमा करुनच साहित्य खरेदी करणे आवश्यक होते परंतु अशी कार्यवाही न करता साहित्य खरेदी नंतर लाभार्थी हिश्याची रक्कम वसुल करुन पावर स्प्रे पंपाचे वाटप केलेले आहे तेव्हा सदरील बाब नियमबाहय ठरते.

6) लाभार्थी हिश्याची रक्कम रुपये 1,78,500/- तालुका कृषि अधिकारी यांनी पुरवठा संस्थेकडे तात्काळ भरणा करणे आवश्यक असताना लेखापरीक्षण कालावधीपर्यंत 40 नगाची लाभार्थी हिश्याची रक्कम रुपये 1,02,000/-

पुरवठादारास प्रदान केल्याचे दिसुन आले नाही. सदर रक्कम पुरवठादारास प्रदान करुन त्यांचे कडुन महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 75 (3) अन्वये रक्कम मिळाल्याबाबतची पोचपावती घेणे आवश्यक आहे.

7) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-4114/प्र.क्र.136/4, दिनांक 23/09/2014 मधील 1(I,ii,iii,iv,v,vi) अन्वये कार्यवाही केलेबाबतचे अभिलेखे संचिकेत दिसुन आले नाहीत.

8) एकाच लाभार्थ्यास शासन, जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरुन दुबार लाभ मिळाले नसेल बाबतची पडताळणी करण्यासाठी लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि पंचायत समितीने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

9) योजना अंमलबजावणी नंतर लाभार्थ्यांकडुन उपयोगिता प्रमाणपत्रे तसेच सक्षम प्राधिकारी यांचा योजने बाबतचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास पहावयास मिळाला नाही.

### 4.409 शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर पावर स्प्रे पंप व वखर खरेदीतील अनियमिततेबाबत.

**पंचायत समिती मानवत, जिल्हा परभणी, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती मानवतने सन 2014-15 मध्ये पंचायत समिती उपकरातुन शेतकऱ्यांना 50 टक्के अनुदानावर वखर 121 नग खरेदी व पावर स्प्रे पंप 20 नग खरेदी पोटी रुपये 1,90,150/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2012/प्र.क्र.680/वित्त-9, दिनांक 31/01/2013 मधील टिप 1 व 4 प्रमाणे पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकनार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु अशी कार्यवाही केले बाबतचा ठराव दिसुन येत नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 126 अन्वये वखर खरेदी प्रती नग 2,300/- व पावर स्प्रे पंप खरेदी प्रती नग 5,100/- या दरास पंचायत समितीने मान्यता दिलेबाबतचा ठराव दिसुन आलेला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर योजना राबविण्यासाठी विहित वेळापत्रकानुसार अंमलबजावणी विहित केलेली आहे. त्यानुसार प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळाले नंतर व लाभार्थी निवडीची प्रक्रिया सर्वार्थाने पुर्ण करुन त्यांचे कडुन लोकवाटा / हिस्स्याची रक्कम जमा करुनच साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश देणे आवश्यक आहे तथापि पंचायत समितीने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

4) सदर योजनेस उपरोक्त शासन निर्णयानुसार ग्रामपंचायत पातळीवरुन प्रसिध्दी देऊन इच्छुक लाभधारकाकडुन अर्ज मागवुन प्राप्त अर्जातुन अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या लाभार्थींची निवड करुन त्यास पंचायत समितीची मान्यता घेऊन लाभ देणे आवश्यक होते तथापि अशी कार्यपध्दती न अवलंबिता जशी जशी लाभार्थींकडुन मागणी आली त्याप्रमाणे त्यांचेकडुन लोकवाटा जमा करुन तसे वखर व पावर स्प्रे पंपाचे वाटप केल्याचे दिसुन येते. त्यामुळे अवलंबिलेली प्रक्रिया वित्तीय औचित्यास अनुसरुन नाही.

5) उपरोक्त शासन निर्णयान्वये लाभार्थी निवड करुन त्यांचे कडुन लाभार्थी हिश्याची रक्कम रुपये 1,90,150/- अगोदर जमा करुनच साहित्य खरेदी करणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही न करता साहित्य खरेदी नंतर लाभार्थी हिश्याची रक्कम वसुल करुन वखर व पावर स्प्रे पंपाचे वाटप केलेले आहे. तेव्हा सदरील बाब नियमबाह्य ठरते.

6) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-4114/प्र.क्र.136/4, दिनांक 23/09/2014 मधील 1 (I,ii,iii,iv,v,vi) अन्वये कार्यवाही केलेबाबतची अभिलेखे संचिकेत दिसुन आली नाहीत.

7) एकाच लाभार्थ्यास शासन, जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरुन दुबार लाभ मिळाले नसले बाबत पडताळणी करण्यासाठी लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे तथापि पंचायत समितीने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

8) योजना अंमलबजावणी नंतर लाभार्थ्याकडुन उपयोगिता प्रमाणपत्रे सक्षम प्राधिकारी यांचा योजनेबाबतचा फलश्रुती अहवाल लेखापरीक्षणास पहावयास मिळाला नाही.

**4.410 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना वखर वाटप योजनेवरील खर्चातील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती वसमत, जिल्हा हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 3) -** पंचायत समिती, वसमतने सन 2014-2015 मध्ये 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना वखर वाटप योजनेवर नमुद प्रमाणकान्वये रुपये 12,58,600/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.446/वित्त-9, दिनांक 20/06/2008 नुसार वेळापत्रकाबाबत योजनेची अंमलबजावणी करण्यात आली नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परीपत्रक क्रमांक पंरास/1084/सीआर/1633/57, दिनांक 19/01/1985 अन्वये योजना कार्यान्वित करण्यापुर्वी लोकवाटा वसुल करण्यात आलेला नाही.

3) योजना कोणत्या घटकांसाठी राबविण्यात आली याचा ठरावात उल्लेख नाही.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास-1096/प्रक्र-178/95, दिनांक 09/10/1997 नुसार साहित्याचे वाटप त्याच वित्तीय वर्षात केलेले नाही.

5) विलंबाने पुरवठ्यासाठी 0.5 टक्के ते 10 टक्के पर्यत दंड आकारणे आवश्यक असताना दंड रक्कम कमीत कमी रुपये 12,586/- व जास्तीत जास्त 2,51,720/- आकारला नाही.

**4.411 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना वखरवाटप खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती, औंढा ना. यांनी सन 2014-2015 मध्ये 50 टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना वखर वाटप योजनेवर नमुद प्रमाणकान्वये रु. 94,250/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, राजपत्र विक्रीकर आयुक्त अधिसुचना क्रमांक विसआ (मुख्य)/मुवक 2005/97, दिनांक 29/08/2005 प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन देय रक्कमेच्या 2 टक्के रक्कम विक्रीकर रुपये 1,885/- कपात केली नाही.

2) केंद्र शासन आयकर अधिनियम, 1961 चे कलम 194(क) नुसार देयकातुन आयकर रक्कम रुपये 1,885 /- कपात केला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, परिपत्रक क्रमांक पंरास/1096/प्र.क्र.178/95, दिनांक 09/10/1997 मधील तरतूदीनुसार लाभार्थी निवड करण्यात आली नाही. तसेच वित्तीय वर्ष संपल्यानंतर साहित्याचे वाटप करण्यात आले.

4) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/1076/प्र.क्र.872/जल 2 ब, दिनांक 10/10/1996 अन्वये साहित्याच्या मागणीचा आढावा न घेता खरेदी केली.

5) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, परिपत्रक क्रमांक पीआरसी-1093/सीआर/1074/57, दिनांक 29/07/1983 अन्वये योजनेचा उद्देश्य सफल झाल्याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही.

6) लाभार्थी निवड यादीस पंचायत समितीची मंजुरी घेण्यात आलेली नाही.

7) साहित्याचा चाचणी अहवालासाठी नमुना देण्यात आलेला नाही.

8) ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पंरास/सीआर/1633/57,दिनांक 19/01/1985 नुसार पुरवठा आदेश देण्यापुर्वी लाभार्थी हिश्याची रक्कम वसुल केलेली नाही.

9) लाभार्थी मस्टर नोंदवही ठेवलेली नाही.

10) लोकवाटा पुरवठादार संस्थेस जमा केल्याची पोंच दर्शविली नाही.

11) साहित्य वाटप केलेल्या लाभार्थ्यांचे प्रस्ताव उपलब्ध केलेले नाहीत.

**4.412 पंचायत समिती उपकर 11-कृषी अंतर्गत 50 टक्के अनुदानावर चाकजोडी खरेदीतील अनियमितताबाबत.**

**पंचायत समिती किनवट, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती किनवटचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 1,55,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारणा विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2008/प्र.क्र.444/ वित्त-9 दिनांक 19/03/2012 अन्वये पंचायत समिती स्तरावर देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेची माहिती पुढील पंचायत समितीच्या बैठकीत अवलोकणार्थ सादर करणे अनिवार्य आहे. परंतु उक्त नियमाप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

2) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जसलंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक 1084/सीआर/1633,दिनांक 19/01/1995 प्रमाणे लाभार्थी हिस्साची रक्कम प्राप्त केल्यानंतरच खरेदीची कार्यवाही करणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

3) पंचायत समिती उपकरातून योजना राबवितांना योजनेचे प्रारूप तयार करून लाभार्थी निवड पद्धती अटी/शर्ती निश्चित करणे आवश्यक आहे तथापी पंचायत समितीने प्रारूप व लाभार्थी निवड पद्धती निश्चित न केल्यामुळे अपात्र लाभार्थींची निवड होवून लाभ दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 (1) नुसार गुणवत्ता चाचणी बाबत शासन मान्य संस्थेचे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही. तथापी नियम 83 (3) प्रमाणे प्रत्यक्ष खरेदी केलेल्या चाकजोडी योग्य गुणवत्तेची असले बाबत प्रमाणपत्र नोंदविले नाही.

**4.413 50 टक्के अनुदानावर ॲडजेस्टेबल हॅरो (डावरा) खरेदी खर्चाबाबत.**

**पंचायत समिती देगलूर, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती देगलूरचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 2,49,550/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 चे कलम 99 व 125 प्रमाणे प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे स्वतंत्र आदेश संचिकेत नाहीत.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 126 अन्वये प्रतिनग दरास पंचायत समितीचा मान्यता ठराव संचिकेत जोडला नाही.

3) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/2008/प्र.क्र.446/ वित्त-9,दिनांक 20/06/2008 नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील राबविण्यात येणा-या योजनांबाबत विहित वेळापत्रकानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक असतांना अशी अंमलबजावणी करण्या न येता योजना राबवण्यात आली.

4) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पूणे यांचे मार्गदर्शक सुचनांमधील अनुक्रमांक 15 (ब) (4) अन्वये औजारांचा पूरवठा पूर्व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर देयकाची 90 टक्के रक्कम पूरवठादारास अदा करावी उर्वरित 10 टक्के रक्कम पूरवठा पश्चात क्षेत्रीय पध्दतीने काढलेल्या नमून्याच्या गुणवत्ता तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानतंर अदा करावी असे स्पष्ट निर्देश असतांना पंचायत समितीने पूरवठादारास 100 टक्के रक्कमेचे प्रदान केले आहे.

5) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, देगलूर यांनी पुरवठा आदेश दिला असून पुरवठा आदेशावर क्रमांक व दिनांक नमुद नाही.

6) उपरोक्त् शासन निर्णयान्वये लाभार्थी निवड करुन त्याचेकडून लाभार्थी हिस्याची रक्कम रुपये 2,49,550/- अगोदर जमा करुनच साहित्य खरेदी करणे आवश्यक होते परंतु अशी कार्यवाही न करता साहित्य खरेदी नंतर लाभार्थी हिस्याची रक्कम वसुल करुन साहित्य वाटप केलेले आहे. तेव्हा सदरील बाब नियमबाहय ठरते.

7) एकाच लाभार्थ्यास जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरुन दुबार लाभ मिळाले नसले बाबतचे पडताळणी करण्यासाठी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापी पंचायत समितीने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

**4.414 शेतक-यांना 100 टक्के अनुदानावर टिनपत्रे खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मुखेड, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 15) -** पंचायत समिती मूखेडचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 9,54,146/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1961 चे कलम 99 व 125 प्रमाणे प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे परिशिष्ट 4 चे नियम-2 अन्वये तरतूद केलेल्या निधीतून खर्च करतांना अर्थसंकल्पीय अंदाजात ज्या प्रयोजनार्थ तरतूद करण्याचे उदिदष्ट ठेवून अनुदान मंजूर केली. त्याच प्रयोजनांसाठी खर्च करण्यात यावा आणि अशा प्रत्येक अनुदानातून केलेल्या खर्चाची रक्कम हि अर्थसंकल्पिय अंदाजात समाविष्ट करण्यात आलेल्या रक्कमेपेक्षा अधिक होता कामा नये. असे असतांना पंचायत समिती उपकर मध्ये निधी उपलब्ध नसतांना सदर खरेदीसाठी प्रमाणक क्रमांक 10,दिनांक 25/08/2014 अन्व्ये रुपये 1,56,146/- जिल्हा परिषद उपकरातील निधी नियमबाहयरित्या वापरण्यात आला.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 126 अन्वये साहित्य खरेदी प्रतिनग दरास पंचायत समितीने मान्यता दिलेबाबतचा ठराव दिसून आलेला नाही.

4) उपरोक्त शासन निर्णयान्वये ग्रामपंचायत पातळीवरुन प्रसिध्दी देऊन इच्छुक लाभधारकाकडून अर्ज मागवुन प्राप्त अर्जातुन अटी व शर्तीची पुर्तता करणा-या लाभार्तीची निवड करुन त्यास पंचायत समितीची मान्यता घेऊन लाभ देणे आवश्यक होते. तथापी अशी कार्यवाही न अवलंबिता व निवडीची प्रक्रिया पुर्ण न करताच साहित्य खरेदी करुन पंचायत समिती सदस्यांचे शिफारशीनुसार लाभार्थीस साहित्य वाटप केल्याचे दिसुन येते.

5) साहित्य खरेदीचे देयक अदा करण्यापुर्वी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 96 अन्वये साहित्याचे साठा नोंदवहीत नोंद घेवुन त्याचे वाटप दर्शविण्यात आलेले नाही. त्यामुळे लाभार्थी संख्या किती व किती साहित्य वाटप झाले व शिल्लक किती याची खात्री करता आली नाही.

6) एकाच लाभार्त्यास शासन जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरुन दुबार लाभ मिळाले नसलेबाबतचे पडताळणी करण्यासाठी लाभार्थी मास्टर नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. तथापि पंचायत समितीने अशी नोंदवही ठेवलेली नाही.

**4.415 दत्त जयंती निमित्त कृषी अंतर्गत फ़ळफ़ळावळे, भाजीपाला प्रदर्शना वरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती माहुर, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 17) -** पंचायत समिती माहूर सन 2014-15 च्या लेखापरीक्षणात दत्त जयंती निमित्त माहूर येथे फळफळावळ / भाजीपाला प्रदर्शनावर एकुण (09 प्रमाणकान्वये) रक्कम रुपये 25,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परीषद पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 210 ब नुसार गटविकास अधिकारी यांना रुपये 500/- पर्यंत अग्रीम मंजूर करण्याचे अधिकार आहेत. परंतु गटविकास अधिकारी पंचायत समिती माहूर यांनी रुपये 25,000/- नियम बाहयरित्या अग्रीम मंजुर केले आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 83 (2) प्रमाणे रुपये 1,000/- पेक्षा वरील रक्कमेस दर पत्र मागविणे आवश्यक आहे. उपरोक्त नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

3) सदरील भाजीपाला प्रदर्शनात दिनांक 06/12/2014 रोजी किती शेतक-यांनी सहभाग नोंदविला याबाबत उपस्थिती नोंदी ठेवण्यात आली नाही. महाराष्ट्र जिल्हा परीषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 79 अन्वये ज्याबाबतीत प्रदान केले आहे त्याचा सविस्तर तपशिल व तत्सम कागदपत्रे बिलासोबत जोडणे व प्रदानानंतर ते उपप्रमाणके विरोपीत करणे आवश्यक आहे. यानूसार कार्यवाही केलेली नाही.

**4.416 कृषी गोदामात विनावाटप पडून असलेल्या साहित्याबाबत व साहित्य वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती नायगांव (खै.), जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती नायगांव खै. चे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 1,74,682/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती कृषी विभागाच्या विविध योजनेअंतर्गत कृषी अवजारे / निविष्ठांचा लाभधारकांना योजनेमध्ये ठरवून दिलेल्या अटीनुसार साहित्यवाटप लाभार्थी हिस्सा वसुल न करताच योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 50 नुसार नमुना क्रमांक 10 प्रमाणे लाभार्थी हिस्सा प्राप्त झाले बाबत पावती देण्यात आलेली नाही.

3) डिझेल इंजिन 3 एच.पी.12 नग व डावरा सेट 45 नग पंचायत समिती माहूर येथे वर्ग केल्याचे साठा नोंदवहीत नोंद आहे. परंतू साहित्य प्राप्ती बाबत पोच घेण्यात आली नाही.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता 1968 चे नियम 98 (1) नुसार गटविकास अधिकारी यांनी दरवर्षी जूनमध्ये साठा नोंदवहीची पडताळणी करुन नियम 98 (3) मधील विहित नमुन्यात प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांना पाठविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

5) साहित्य वाटप केलेले आहेत परंतू लाभार्थी हिस्सा रक्कम वसूल करुन पूरवठादारास प्रदान केल्याबाबतचे धनाकर्ष (पोच) संचिकेत नस्तीबंध ठेवलेले नाहीत. त्यामूळे पुरवठा केलेल्या साहित्याची रक्कम प्रदान बाबत तपासणी करता आली नाही.

**4.417 बैलजोडी खरेदी खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती धर्माबाद, जिल्हा नांदेड, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती धर्माबादचे सन 2014-2015 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षणात रक्कम रूपये 15,30,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) बैलजोडी खरेदी करुन वाटप केल्यानतंर लाभार्थ्यांकडून रुपये 100 चे बंधपत्रावर करारनामे करुन घेण्यात आलेले नाहीत.

2) प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता घेतल्याचे अभिलेखे लेखापरिक्षणास सादर केले नाहीत.

3) बैलजोडी खरेदी केल्याचे दाखले लेखापरिक्षणस दर्शविले नाहीत.

4) लाभार्थी निवड यादी लेखापरिक्षणास दर्शविली नाही.

5) लाभार्थी निहाय / बाब निहाय / योजना निहाय नोंदवही दिसून आली नाही.

**4.418 कृषि योजने अंतर्गत कृषी औजारे लोकवाटा रक्कमेचा भरणा न केलेबाबत.**

**पंचायत समिती लातूर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 34) -** पंचायत समिती, लातूर सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात गट विकास अधिकारी, लातूर व MAIDC उस्मानाबाद यांचे पत्रानुसार सन 2006-07 पासून जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील कृषी विभाग अंतर्गत राबविण्यात येणा-या योजनेच्या साहित्याची लोकवाटयाची रक्कम रुपये 6,33,755/- संबधिताकडे प्रलंबित असल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांचे पत्र जा.क्र.जीपला/अर्थ/अपप-2/कार्य-29/ कावी-646/15,दिनांक 05/11/2015 नुसार संबंधित पंचायत समितीचे भांडार तपासणी करून लोकवाटयाच्या प्रलंबित रक्कमा बाबत अहवाल निर्गमित केलेला आहे.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लातूर पत्र जा.क्र.पसउ/कृषी/कावी-486/15,दिनांक 17/11/2015 नुसार साहित्य वाटप झालेले असून सन 2006-07 ते 2014-15 पर्यंत संबंधिताकडे रक्कम रुपये 6,33,755/- हातावर शिल्लक आहेत. संबधित भांडारपाल / लिपिक / भांडार सहाय्यक लिपिक यांनी लोकवाटयाची रक्कम स्वत:कडे बाळगून अपहर केल्याचा संशय आहे. तरी संबधिताची योग्य ती तपासणी करून रक्कम रुपये 6,33,755/- तात्काळ वसूल करावी. तसेच अपहर / गैरव्यवहार बाबत सत्यता तपासून संबधितावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 36 (1) व (2) नुसार गट विकास अधिकारी, यांनी प्रलंबित लोकवाटा वसुली बाबत संबंधितावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. व प्रलंबित लोकवाटा बाबत प्रतिबंधात्मक कार्यवाही अनुसरली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 91 नुसार सक्षम प्राधिका-याने नमुना नंबर 33 (साठा नोंदवही) ची पडताळणी केलेली नाही. तसेच वार्षिक तपासणी सुध्दा झालेली नाही.

**4.419 कृषि योजनेंतर्गत कृषि औजारे लोकवाटा रकमेच्या संशयित अपहाराबाबत.**

**पंचायत समिती उदगीर, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 28) -** पंचायत समिती उदगीर, सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात गट विकास अधिकारी यांच्या पत्रानुसार सन 2006-07 पासून जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील कृषि विभाग अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या साहित्याच्या लोकवाटयाची रक्कम रुपये 3,25,958/- संबंधिताकडे प्रलंबित असल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर. यांचे पत्र जा.क्र.जिपला/अर्थ/अपप-2/कार्या-29 /कावि/646/15, दिनांक 05/11/2015 नुसार संबंधित पंचायत समितीचे भांडार तपासणी करुन लोकवाटयाच्या प्रलंबित रक्कमा बाबत अहवाल निर्गमित केलेला आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उदगीर जा.क्र.पंसउ/कृषी/कावि/486/15, दिनांक 17/11/2015 नुसार सोबत दर्शविलेल्या तक्त्यानुसार साहित्य वाटप झालेले असून सन 2006-07 ते 2013-14 पर्यंत संबंधिताकडे रक्कम रुपये 3,25,958/- हातावर शिल्लक आहेत. संबंधित भांडारपाल/लिपिक/भांडार सहाय्यक यांनी लोकवाटयाची रक्कम स्वत:कडे बाळगून अपहार केल्याचा संशय आहे. तरी संबंधीताकडून योग्य ती तपासणी करुन रक्कम रुपये 3,25,958/- एवढी तात्काळ वसुल करावी तसेच अपहार / गैरव्यवहाराबाबत सत्यता तपासून संबंधितावर जबाबदारी निश्चीत करण्यात यावी.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 36 (1) व (2) नुसार गट विकास अधिकारी, यांनी अपहारीत लोकवाटा वसूली बाबत संबंधितावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही व अपहाराबाबत प्रतिबंधात्मक कार्यवाही अनुसरली नाही तसेच सदरील अपहाराबाबत सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयास कळविलेले नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 91 नुसार सक्षम प्रधिकाऱ्याने नमुना नंबर 33 (साठा नोंदवही) चे पडताळणी केलेली नाही तसेच वार्षिक तपासणी सुध्दा झालेले नाही. वरील उणीवांची पुर्तता होईपावेतो रक्कम रुपये 3,25,958/- एवढी लेखापरीक्षणात वसुलपात्र ठरविण्यात येते ती संबंधिताकडून वसूल करण्यात यावी.

**4.420 कृषि योजनेंतर्गत कृषी औजारे लोकवाटा रकमेच्या संशयित अपहाराबाबत.**

**पंचायत समिती निलंगा, जिल्हा लातूर, सन 2014-2015 (परिच्छेद क्रमांक 26) -** पंचायत समिती, निलंगा सन 2014-2015 चे लेखापरीक्षणात गट विकास अधिकारी यांच्या पत्रानुसार सन 2006-07 पासून जिल्हा परिषद व

पंचायत समिती स्तरावरील कृषी विभाग अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या साहित्याच्या लोकवाटयाची रक्कम रुपये 6,75,703/- संबंधिताकडे प्रलंबित असल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांचे पत्र जा.क्र.जिपला/अर्थ/अपप-2/कार्या-29/ कावि/646/15, दिनांक 05/11/2015 नुसार संबंधित पंचायत समितीचे भांडार तपासणी करुन लोकवाटयाच्या प्रलंबित रक्कमा बाबत अहवाल निर्गमित केलेला आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, निलंगा जा.क्र.पंसउ/कृषी/कावि/486/15, दिनांक 17/11/2015 नुसार साहित्य वाटप झालेले असून सन 2006-07 ते 2013-14 पर्यंत संबंधिताकडे रक्कम रुपये 6,75,703/- हातावर शिल्लक आहेत. संबंधित भांडारपाल / लिपिक / भांडार सहाय्यक यांनी लोकवाटयाची रक्कम स्वत:कडे बाळगून अपहार केल्याचा संशय आहे. तरी संबंधीताकडून योग्य ती तपासणी करुन रक्कम रुपये 6,75,703/- एवढी तात्काळ वसुल करावी. तसेच अपहार / गैरव्यवहाराबाबत सत्यता तपासून संबंधितावर जबाबदारी निश्चीत करण्यात यावी.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 36 (1) व (2) नुसार गट विकास अधिकारी यांनी प्रलंबित लोकवाटा वसूली बाबत संबंधितावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही व प्रलंबित लोकवाटा बाबत प्रतिबंधात्मक कार्यवाही अनुसरली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 91 नुसार सक्षम प्रधिका-याने नमुना नंबर 33 (साठा नोंदवही) चे पडताळणी केलेली नाही तसेच वार्षिक तपासणी सुध्दा झालेले नाही.